सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक १

एप्रिल २०२३



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,

मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com

ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com

https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## कोल्हापूर चित्पावन संघाचा नवा उपक्रम !

# चैत्र शुद्ध प्रतिपदेला संपूर्ण मराठी दिनदर्शिका !!

नवीन वर्षात कोल्हापूर चित्पावन संघातर्फे धुंदुरमास सोहळा आणि ज्येष्ठ संगीतकार श्री. श्रीधर फडके यांच्या 'बाबूजी आणि मी' या सुमधूर गीत गायनाच्या यशस्वी कार्यक्रमानंतर संघातर्फे चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या सुमुहूर्तावर संपूर्ण मराठी दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे.

बुधवार, दि. २२ मार्च २०२३ रोजी गुढी पाडव्याला कोल्हापुरातील चहाचे सुप्रसिद्ध व्यापारी मा. श्री. सुबोध गद्रे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. ही दिनदर्शिका प्रकाशित करताना श्री. सुबोध गद्रे म्हणाले की, संपूर्ण मराठी कालगणनेनुसार असलेली ही दिनदर्शिका संग्रहित ठेवण्यासारखी असून अशा प्रकारची दिनदर्शिका कोल्हापुरात प्रथमच प्रकाशित होत आहे. शुक्ल प्रतिपदा ते वद्य अमावास्या, यात इंग्रजी महिना आणि तारखेचाही उल्लेख असलेल्या या दिनदर्शिकेत चित्पावनांची आडनावे, गोत्रे, कुलदैवत, कुलदेवी, त्यांची ठिकाणे, या ठिकाणी कसे जायचे याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

या दिनदर्शिकेसाठी श्री. संजीव चिपळूणकर यांनी विशेष परिश्रम घेतले असून त्यासाठी त्यांचे विशेष कौतुक आहे. त्यांना निर्मितीमध्ये संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, कार्यवाह श्री. केदार जोशी आणि संचालक श्री. मकरंद करंदीकर, श्री. प्रसाद खाडिलकर आणि सौ. मंजुश्री गोखले यांनी सहकार्य केले आहे. चित्पावन संघाच्या सभासदांना ही दिनदर्शिका मोफत वितरीत करण्याचा संकल्प केला असून सर्व आजीव सभासदांनी संघाच्या कार्यालयातून ही दिनदर्शिका घेऊन जावी असे आवाहन उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी केले आहे.

## चलो कोल्हापूर ! ब्राह्मण जोडो !! चलो कोल्हापूर !!!

# सर्व ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत असलेल्या भगवान श्री परशुरामांचा जन्मोत्सव



यावर्षी सर्व ब्राह्मण समाज संघाटनांतर्फे शनिवार, दि. २२ एप्रिल २०२३ रोजी येणारा भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळा भव्य प्रमाणात साजरा होणार आहे. कोल्हापूर चित्पावन संघाच्या पुढाकारातून कोल्हापुरातील सर्व ब्राह्मण पोटजातींतर्फे सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार एकत्र येऊन हा जन्मोत्सव साजरा करण्याचे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, कार्यवाह श्री. केदार जोशी आणि संचालक श्री. मकरंद करंदीकर यांनी सर्व ब्राह्मण समाज बांधवांना केले आहे.

या कार्यक्रमास फक्त कोल्हापुरातीलच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातील ब्राह्मण समाज बांधवांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन आपली समाजशक्ती दाखवावी असे आवाहन समस्त ब्राह्मण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. समस्त ब्राह्मणांनी शनिवार, दि. २२ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ४ वाजता पेटाळा ग्राऊंड, महाद्वार रोड येथून सुरू होणाऱ्या श्री परशुराम पालखी व शोभायात्रेत सहभागी व्हावे, ही विनंती.

आपल्या संपूर्ण ब्राह्मण समाजाची संघटनशक्ती दाखवणेची हीच वेळ आहे हे लक्षात असू द्या ! त्यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. सर्वांनी हजारोंच्या संख्येने आपला सहभाग नोंदवावा ही विनंती.

**अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी मोबा. क्र. ७६२०५४६२२५ व ८४८४८५१५९१ वर संपर्क साधावा.**

**आवाहन :** या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी खर्चाचे मोठ्या प्रमाणात नियोजन करावे लागणार असून त्यासाठी ज्ञाती बांधवांना आवाहन करण्यात येते की त्यांनी उदार हस्ते यासाठी देणगी देऊन सहकार्य करावे. आपल्या देणग्यांना ८० जी नुसार आयकर सवलत मिळणार आहे.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ९ वे : अंक ९ : एप्रिल २०२३**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) **संपादकीय /४**

२) **स्टॅच्यू ऑफ युनिटी – एक व्हिजन /५**
- सौ. मंजुश्री गोखले

३) **आम्ही कृष्णसख्या – 'ललिता' /७**
- ज्योत्स्ना शिंत्रे

४) **म्हणींचे म्हणणे /१०** - वैदेही जोशी

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' / १२**
- सौ. मंजुश्री गोखले

६) **ज्ञानसूर्याची सावली /१४**
- सौ. मंजुश्री गोखले

७) **मुलांचे करिअर आणि पालकांची मानसिकता /१७** - वैभव फाटक

८) **जागतिक महिला दिनाच्या प्रणेत्या – थेरेसा सर्बल माल्कल /२१**

९) **भारतीय सर्कसचे जनक – विष्णुपंत मोरेश्वर छत्रे /२३**

१०) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे, विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष) 0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २० वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी,

एप्रिल महिना म्हणजे प्रचंड ऊन, असह्य उकाडा, परीक्षा आणि हो आंबे सुद्धा ! तेव्हा या सगळ्याला तयार रहा ! अर्थात अधनं मधनं अवकाळी पाऊस हा बातम्यातला इशारा जरा सुखावून जातो. पण तो असो व नसो, वळीव तरी नक्की भेटीला येतो. वाट बघूया.

मित्रांनो, अक्षय्यतृतियेप्रमाणं आपला नवस्नेहही अक्षय्य आनंदाचा, माहितीचा ठेवा घेऊन येतो. या अंकात ही तो आहेच. आपल्या नेहमीच्या लेखमालांसोबत गुजरातमध्ये असलेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटी, एकात्मतेचे स्मारक याला मी नुकतीच भेट देऊन आले. आपल्यापैकी बहुतेकांनी ते पाहिलं असेल. पण ते पाहताना मला जे भावलं, वेगळं वाटलं त्याबद्दल थोडसं लिहिलं आहे. आपल्याला ते आवडेल या विश्वासानं ते मासिकात घातलंय. तुम्ही म्हणाल 'हा काय त्रास? आम्ही बघितलेलंच काय परत वाचायचं?' पण एखादं ठिकाणी पाहताना प्रत्येकाची दृष्टी वेगवेगळं पाहते. खरं ना? तसंच आहे हे ! वाचा आणि भावलं तर मला कळवा हं! ते म्हणतात ना,

लैला को देखने के लिए मजनू की आँखे चाहिए। तसं काहीसं आहे. पण खरं सांगू ! हे मासिकात देण्याचा माझा आणखी एक उद्देश आहे. आता परीक्षा संपतील. पर्यटनाला जाण्याचे बेत ठरतील. जे ठिकाण बघायला जाल तिथं ढोबळ मानाने जे सगळे पाहतात ते बघाच. पण तिथंही अशा काही गोष्टी असतात, जे इतर सहज फिरणारे कोणी पहात नाहीत, त्या आवर्जून बघा. एकच उदाहरण देते, सिमल्याला गेले असताना पहाटे हॉटेलच्या बाहेर पडले. दूधवाले, पेपरवाले होते. त्यांच्याशी गप्पा मारताना असं कळलं की, तिथे हनुमानाचं नाव सकाळी सकाळी घेत नाहीत. कारण विचारलं तर तो दूधवाला म्हणाला, 'कौन संकट मोल लेगा दीदी?' संकटमोचन हनुमानाचं नाव घेणं म्हणजे संकटाला आमंत्रण देणं हे ऐकून मला नवल वाटलं. असो. सांगण्याचा मतितार्थ एवढाच की, वेगळ्या दृष्टीनं ठिकाण पहा. हनुमान जयंतीच्या निमित्तानं हे आठवलं.

तर मंडळी 'नाटू नाटू' ला ऑस्कर मिळालं याचा अत्यंत आनंद तर आहेच. पण त्याहीपेक्षा आपल्या भारतीयांची क्षमता सिद्ध झाल्याचा आनंद जास्त आहे. बुद्धीमत्तेत आणि क्षमतेत आपण कमी पडत नाही हे वारंवार सिद्ध होतय. मात्र ही जागतिक मोहोरही फार महत्त्वाची आहे.

पुढच्या महिन्याच्या अंकात लहान मुलांसाठी एक विशेष पान असणार आहे. मला वाटतं बच्चे कंपनीला ते आवडेल. आपला नवस्नेह असा सर्वंकष करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. तुमचा पाठिंबा आणि शुभेच्छा असणारच आहेत. शिवाय भगवान श्री परशुरामांचाही आशीर्वाद आहेच आहे.

**अपनों का साथ बहुत कुछ देता है**

**सुख हो तो बढ़ जाता है ।**

**दु:ख हो तो बाँट जाता है ।**

तेव्हा आपला नवस्नेह, सोबत आमरस पोळी असा बेत करून उन्हाळा सुसह्य करूया !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मोबा. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

## मुखपृष्ठ कथा

# स्टॅच्यू ऑफ युनिटी - एक व्हिजन

एखादं राष्ट्र समृद्ध होतं ते राज्यकर्त्यांच्या दृष्टीमुळं. व्हिजन मुळं. सत्ता, संपत्ती असेल आणि दृष्टी नसेल तर सगळं व्यर्थ जातं. मात्र दृष्टी आहे पण सत्ता किंवा संपत्ती नाही तरी फारसं बिघडत नाही. कारण ती दृष्टीच यश खेचून आणते. आणि सत्ता, संपत्ती आणि दृष्टी तिन्ही असेल तर मरूभूमीचे नंदनवन होते ! याचा प्रत्यय 'द स्टॅच्यू ऑफ युनिटी : एकात्मतेचं स्मारक' बघताना आला. भाच्याच्या लग्नासाठी गुजरातला जाणं झालं. तेव्हा स्टॅच्यू ऑफ युनिटी बघायला गेलो आणि दृष्टी काय काय करू शकते याची पावलोपावली प्रचिती आली.

गुजरातला तसा डोंगराळ भाग कमी. त्यात डोंगर, कडे-कपारी शोधून नर्मदा नदीवर सरदार धरण बांधलं. गुजरातची भूमी सुजलाम् सुफलाम् झाली. त्या धरणाच्या आसपासचा भाग डोंगर टेकड्यांचा. तसा ओसाड, जंगली. मनुष्यवस्ती नसलेला. पण याच भागात एकात्मतेचं स्मारक उभं राहिलं आणि या भागाचं स्वरूपच पालटलं. विशेष म्हणजे हे स्मकारक उभे करताना जो काही सर्वांगीण विचार केला गेला आहे ना त्याला तोड नाही !

गुजरातमध्ये राजपिपळा शहराजवळ नर्मदा नदीवरील सरदार सरोवरजवळ साधू बेटावर हे स्मारक उभं केलं आहे. स्वतंत्र भारताचे पहिले संरक्षण मंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा हे एकात्मतेचं स्मारक आहे. २०,००० मीटर परिसरात हे उभारले असून १२ कि.मी. परिघात बनवलेल्या दोन कृत्रिम तलावाने वेढलेले आहे. गुजरातच्या प्रत्येक शहरातून इथे जायला बसेस आहेत. १८२ मीटर उंच म्हणजे अंदाजे ६०० फूट उंच असलेला हा पुतळा जगातील सर्वात उंच पुतळा म्हणून सन्मानित झाला आहे. प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांनी हा बनवला असून ३१ ऑक्टोबर २०१४ ला याची सुरुवात केली. १ नोव्हेंबर २०१८ ला हा पूर्णत्वास गेला. २९८९ कोटी रुपये अंदाजे या स्मारकाला खर्च आला. तो लार्सन अॅन्ड टुब्रो (L&T) या कंपनीने केला. हा सगळा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एकूण ३००० कोटी रुपये खर्च झाले. बांधकामासाठी ४२ महिने लागले. या पुतळ्याचे वजन ६७,००० किलोग्रॅम आहे. वारा,पाऊस, भूकंप यापासून हा संरक्षित आहे. ४,५०० मजूर साडेचार वर्षे इथे राबत होते. ३०० आर्किटेक्ट यात सहभागी होते. हा पुतळा ब्रांझ (तांबे), लोखंड, स्टील या धातूंनी बनवला असून सिमेंट आणि धातूच्या आवरणानी मजबूत केला आहे. ५ लाख शेतकऱ्यांनी हा पुतळा तयार करण्यासाठी त्यांची शेतीची वापरलेली औजारे दिली आहेत.

पुढच्या वर्णनावरून या पुतळ्याची भव्यता व मजबूती लक्षात येते. ७५,००० क्यूबिक मॅट्रिक टन काँक्रिट, ५,७०० मेट्रिक टन स्टील, १८,५०० टन स्टील रॉड, २२,५०० टन ब्रांझ वापरले आहे. चबुतऱ्यासकट पुतळ्याची उंची २४० मीटर आहे. जवळपास ८५% तांबे यात वापरले आहे. त्यामुळे याला गंज चढणार नाही. हे झाले पुतळ्याचे वर्णन. पण मला वेगळ्याच व्हिजनबद्दल बोलायचे आहे.

पुतळ्यापासून पाच किलोमीटर अंतरावर श्रेष्ठ भारत एकता भवन चौक आहे. तिथे उत्तम पार्किंगची विशाल जागेवर व्यवस्था आहे. त्या चौकापर्यंत बस, टॅक्सी, स्वत:ची वाहने नेता येतात. तिथून पुढे ज्यांना शक्य असेल त्यांनी चालत जायचं. ज्यांना शक्य नसेल त्यांच्यासाठी ऑटो रिक्षा आहेत. या रिक्षा तुम्हाला चार किलोमीटर आत घेऊन जातात. विशेष म्हणजे गुलाबी रंगाच्या या सगळ्या म्हणजे जवळ जवळ ५०० रिक्षा स्त्रियांच्या आहेत. स्त्रियाच त्या

चालवतात. यात २० वर्षांपासून ५० वर्षांपर्यंतच्या स्त्रिया आहेत. गुजरात सरकारने या स्त्रियांना रिक्षा घेऊन दिल्या. त्यांना ट्रेनिंग दिले, दररोज ९०० रुपये या स्त्रियांनी सरकारला द्यायचे. एकाफेरीला ११० रुपये होतात. जास्त फिरायचे (इतर स्थळे पाहण्याकरता) तर जास्त होतात. रोज या रिक्षांच्या २० ते २५ फेऱ्या होतात. सरकारला ९०० रुपये देऊन या स्त्रियांना अंदाजे रोजचे १५०० रुपये रहतात. त्यात तेल-पाणी, मेंटेनन्ससाठी ५०० रुपये गेले तरी रोजचे १००० रुपये या मिळवतात. यांच्या मुलांना शालेय शिक्षण फ्री आहे. या स्थळाला रोज साधारण १०,००० लोक भेट देतात आणि तितक्याच लोकांना इथं रोजगार उपलब्ध झाला आहे.

शुद्ध, थंड पाण्याचे बूथ आत ठिकठिकाणी आहेत. हे पाणी फुकट आहे. एक किलोमीटरचे अंतर चालून गेल्यानंतर पुढे जाण्यासाठी आडवे सरकते जिने, उभे सरकते जिने अशी थेट पुतळ्यापर्यंत व्यवस्था आहे. प्रत्येक जिन्याजवळ दोन्ही बाजूला सुरक्षारक्षक म्हणून स्त्रियाच आहेत. आत सगळीकडे अत्यंत स्वच्छता, देखणा परिसर, येता-जाता ऊन लागू नये म्हणून केलेली छतांची व्यवस्था ! खरं सांगू तो पुतळा आणि विशेषत: हे सगळं पाहताना डोळे भरून आले !

या पुतळ्याव्यतिरिक्त रात्रीच्या वेळी लेसर शो, जंगल सफारी, बटरफ्लाय गार्डन, म्युझियम, सरदार सरोवर, बोट रॅफ्टींग, बोटींग, खान-पान सुविधा अशा अनेक सोयींनी व प्रेक्षणीय स्थळांनी हा परिसर सुशोभित झाला आहे. दृष्टीकोन मजबूत असला की काय करता येतं हे लोहपुरुष सरदार पटेलांनी दाखवून दिलंच होतं. गुजरातचे राज्यकर्तेही त्यांच्या मजबूत पावलावर पाऊन ठेवून चालताहेत आणि अशी व्हिजन असणारे त्यांचे सेनानायक आहेत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी ! स्वप्नं फक्त पहायची नसतात, तर ती प्रत्यक्षात उतरवायची असतात. खरं ना ?

**– सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**शनिवार, दि. 22 अक्षय्यतृतिया**
**शुक्रवार, दि. 28 पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर,**
**0231-2546585**


## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**– अध्यक्ष**

# आम्ही कृष्णसख्या - ललिता

**(लेखांक तिसरा)**

ललिता ही पण गोकुळातील एक गोपिका, म्हणजे गोपपत्नी. गोकुळातल्या बहुतेक सगळ्याच गवळणी, गोपिका जशा कृष्ण प्रथम दर्शनाने त्याच्या प्रेमात-आकर्षणात सापडल्या तशीच ललिताही सापडली. ही खरं तर गोकुळापासून काहीशी दूर बरसाना या गावात रहात होती. बरसानामधील ऊंचा गांव हे तिचे गांव. जेव्हा राधा सर्वप्रथम तिचे वडील वृषभानू यांच्याबरोबर बरसाना इथे राहायला आली, तेव्हा राधा आणि ललिता एकमेकांच्या संपर्कात आल्या. ही राधेपेक्षा वयाने थोडी मोठी होती खरी, पण त्या दोघी घट्ट मैत्रिणी होऊन गेल्या. राधेचे कुटुंब जरी कंसाच्या अत्याचाराच्या भीतीने वृंदावन येथे रहावयास आले, तरी राधेचे आपल्या मैत्रिणीना भेटायला म्हणून बरसाना येथे येणे जाणे होतेच. कधीतरी तिच्या मैत्रिणीही तिच्या घरी वृन्दावनला येतच असणार... तेव्हाच कधीतरी ललितेला कृष्णदर्शन झाले असावे. तीही राधेप्रमाणेच कृष्णाच्या आकर्षणाच्या भोवऱ्यात ओढली गेली.

परंतु तिचे रोजचे रहाणे आणि व्यवहार बरसाना इथेच होत होते. त्यामुळे तिचा आणि राधेचा स्नेह संबंध हळूहळू कमी होत गेला असता पण परमेश्वर आपल्या खऱ्या भक्ताला स्वतःकडे खेचून घेण्यासाठी काही ना काहीतरी उपाययोजना करतच असतो. त्याप्रमाणेच ईश्वराच्या इच्छेनुसारच राधेचे लग्न लवकरच बरसाना येथील कृष्णाच्या मनाशी अनयाबरोबर झाले आणि राधा पुन्हा बरसाना येथेच रहावयास गेली. अर्थातच कृष्णाचे आणि तिचे येणे जाणे चालूच राहिले; आणि अर्थातच राधेची परम मैत्रिण ललिताही कृष्ण संपर्कात येत राहिली. ज्योतीने ज्योत लावावी अशी ललितेची अवस्था झाली.

ललितेचे एक नाव अनुराधा असेही होते. राधेची अनुगामिनी ती अनुराधा. तिला नेहेमीच राधा कृष्णाचे परम एकत्व दिसत होते. तीही कृष्णाकडे तितक्याच प्रमाणात आकर्षित झालेली होती. परंतु ती नेहेमीच थोडीशी मागे राहिली; जाणून बुजून, राधेच्या भक्तीची थोरवी जाणून, ती एका छायेप्रमाणे राहिली. कधीही तिने राधा कृष्णाच्या मध्ये खोडा घालण्याचा प्रयत्न केला नाही. तिला नेहेमीच जाणीव होती की राधेचे स्थान अबाधित राहिले पाहिजे, राधेला नेहमीच प्राधान्याने कृष्णाजवळ स्थान असले पाहिजे. कारण तिच्या उत्कट भक्तीमुळे तिला पूर्ण जाणीव होती की राधेचे स्थान कृष्णाच्या मनात काय आहे? कृष्ण आणि राधा यांच्या एकत्वाची तिला पूर्णपणे जाणीव होती आणि त्यामुळे तिला कधी ईर्षा उत्पन्न झाली नाही, उलट ती सदैव राधा कृष्णांना सहाय्यकारीच झाली. तिचीही ज्याच्यावर पूर्ण भक्ती होती तो कृष्ण राधेच्या सहवासात अधिक रमतो, हे तिने मनोमन मान्य केले होते. त्यामुळे तिचा उल्लेख भागवतात खंडिता भावाची सखी असा केला आहे. परंतु खंडिता नायिका जशी आपल्या प्रियकरावर रागावून रुसून, 'सौतन संग रात बितायी, काहे करत अब झूटी बतियां' म्हणते तसे तिने कधीच म्हटले नाही. तो भाव-अधिकाराचा भाव तिने कधीच मनात आणला नाही. उलट ती राधा कृष्णाच्या रासक्रीडेत सर्वार्थाने सहभागी होत राहिली, सहाय्यकरी होत राहिली.

तिने तिचे दुय्यम स्थान मनोमन मान्य केले होते. खरे, पण तीही कृष्णमयच झाली होती त्यामुळे

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

राधेने जशी कृष्ण रंगाची, काळसर निळसर वस्त्रांची निवड केली, तशी तिची निवडही कृष्णाच्या पीतांबराच्या रंगाची होती. तिने कृष्ण भक्तीचे प्रतीक म्हणून सोनेरी पिवळ्या रंगाची वस्त्रे आणि कृष्णाला अति प्रिय असलेल्या मोरपिसाच्या रंगाचा शृंगार अंगिकारला होता. तिची सोनेरी पिवळी वस्त्रे तिचा मानी, जिद्दी परंतु आनंदी उत्फुल्ल मिश्किल स्वभाव दर्शवतात. तिच्या मोरपिशी आणि सोनेरी पिवळ्या रंगांच्या आवडीमधून तिच्या झोकून देऊन, दुसऱ्याला मदत करण्याची तयारी आणि त्यासाठी वेळप्रसंगी काहीही करण्याची वृत्ती दिसते . हा तिचा स्वभाव पुढे दिलेल्या महादेवाच्या कथेत प्रकर्षाने दिसून येतो. जेव्हा राधा कृष्ण वृंदावनात एकमेकांना भेटत असत, किंवा त्यांची रासक्रीडा चालत असे त्यावेळेस इतर परके कोणीही तिथे येऊ नये यासाठी ती पूर्ण सजग असे.

तिच्याबद्दलच्या दोन कथा मी सांगू इच्छिते.

एकदा महादेव कृष्णाला भेटायला म्हणून वृंदावनात आले. तेही कृष्णाचे - म्हणजे पर्यायाने विष्णूचे परम भक्तच होते. परंतु पहाऱ्यावर असलेल्या ललितेने त्यांनाही निधीवानात प्रवेश करू दिला नाही, कारण रासक्रीडेच्या वेळेस कोणत्याही पर पुरुषांना प्रवेश नव्हता. महादेव शंकराला तर कसेही करून कृष्णदर्शन हवेच होते. तेही जिद्दीला पेटले, काहीही करून दर्शन हवेच म्हणून.

शेवटी ललितेने त्यांना स्त्रीवेष परिधान करायला लावला आणि मगच त्यांना निधी वनात प्रवेश मिळाला. ईश्वरदर्शनासाठी वाटेल त्या थराला जाऊन तडजोड करायची. तयारी कशा प्रकारे ठेवावी लागते याचा वस्तुपाठच तिने महादेवाना शिकवला. भक्तीची एक वेगळीच पातळी त्यांना दाखवून दिली- ती म्हणजे संपूर्ण समर्पित भक्ती, ईश्वराच्या अटींवर समर्पण. त्यामुळे ती महादेवाला मधुरा भक्ती शिकवणारी त्यांची गुरु म्हटली जाते.

तिच्याबद्दलच्या दुसऱ्या कथेमध्ये ती कृष्णाकडून कशी हातोहात फसली, त्याचे वर्णन आहे.

एकदा तिने काही कारणाने कृष्णाला आव्हान दिले की आज तू बरसाना येथे येऊन राधेला भेटूनच दाखव. तू नेहेमीच राधेला भेटायला जेव्हा बरसाना येथे येतोस, तेव्हा स्त्रीवेषात येतोस. त्यामुळे आम्हाला तुझ्या रूपाची ओळख पटत नाही. तेव्हा तू एकदा पुरुषवेशात येऊन दाखव. आम्ही तुला नक्कीच ओळखू. स्त्रीवेषात तू घुंघट घेऊन येतोस, तुझा चेहरा झाकलेला असतो, त्यामुळे तुझी ओळख मला पटत नाही. कधी येतोस कधी जातोस याचा ठावठिकाणा लागत नाही तर माझे तुला आव्हान आहे की पुरुषवेशात ये, मग मी तुला ओळखते की नाही बघ. कृष्ण म्हणाला, मी पुरुषवेशात आल्यावर पण तू मला ओळखू शकली नाहीस तर काय? पण ललिताने ते आव्हान स्वीकारले - उद्या तू बरसाना येथे राधेच्या महालात पुरुषवेशात येऊन दाखवच. गावात प्रवेश केल्या केल्याच मी तुला ओळखून दाखवीन. हे नक्की..

कृष्ण मनोमन हसला आणि त्याने ललितेचे आव्हान स्वीकारले. उद्या सकाळी बारा वाजेपर्यंत त्याने पुरुषवेशात राधेच्या महालात पोहोचायचे आणि तरीही ओळखले जायचे नाही. आव्हान कठीण तर होतेच, कारण आव्हान देणारी ती ललितेसारखी हुशार आणि चतुर सखी होती. पण तोही काही कमी नव्हता, तो कृष्ण होता.

दुसऱ्या दिवशी सर्व सख्यांना ललितेने बजावून ठेवले. आपले वडील, भाऊ, पती एवढेजण सोडून इतर कुणीही आज बरसानामध्ये प्रवेश करता कामा नये. कोणीही परका पुरुष नाही; मग तो कोणीही असो, अशा कडेकोट तयारीने, पहारा बसवून ललिता देखरेख करत राहिली.

इकडे कृष्णानेही आपली तयारी केली. त्याने एका म्हाताऱ्या ज्योतिषाचा वेष घेतला. डोक्याला मोठ्ठे पागोटे, कपाळाला भस्म, भुवया पांढऱ्या रंगाने रंगवलेल्या, पांढऱ्या मोठ्या मिशा, पूर्ण अंग झाकून टाकेल अशी सैलशी बाराबंदी, धोतर, त्याची

सुकुमार पावले झाकतील असे प्रवासी जोडे, काखेत पोथ्या, पत्रिकांचे बाड अशा वेशात कृष्ण आला आणि गावाबाहेरच्या एका झाडाच्या पारावर बसला. असा वृद्ध, तेजस्वी ज्योतिषी पाहिल्यावर सर्व गावकरी आपला हात दाखवून आपले भविष्य पहाण्यासाठी त्याच्या भोवती जमा झाले. तोही नावा-गावासकट सर्वांना भविष्य सांगू लागला. कारण तो सर्वांनाच ओळखत होता. ही बातमी ललितेपर्यंत पोहोचली. ती उत्सुकतेने गावाबाहेर आली. तिला पाहताच ज्योतिषी उदगारला, 'ये ललिते, तुझीच वाट पहात होतो किती वेळची !'

ललिता आश्चर्यात बुडून गेली. नुसता आपला चेहरा पाहिल्या पाहिल्या आपले नाव सांगणारा हा कोणीतरी फारच मोठा ज्योतिषी दिसतो आहे. म्हणून ती स्वतःचाच कायदा मोडून त्याला राधेच्या महालात घेऊन गेली. तिने राधेला सगळी हकीकत सांगितली. आणि त्या ज्योतिषाला राधेजवळ सोडून पुन्हा पहाऱ्यासाठी निघून गेली. थोड्या वेळाने परत आत आल्यावर पहाते तो काय राधेचा हात धरलेला तो ज्योतिषी आणि राधा एकमेकात हरवूनच गेलेले होते.

ललिता म्हणाली- अहो, ज्योतिषी महाराज, तुम्ही राधेचे भविष्य सांगताय ना? मग तिचा हात हातात धरून काय बसलात ?

ज्योतिषी हसला आणि म्हणाला, तिचं भविष्य मी केव्हाच जाणलं आहे. ती ज्याची वाट पहात झुरत आहे , तो सध्या तिच्या महालात आहे. तिचा हात धरून बसला आहे. आणि अजून बारा वाजायला काही काळ अवकाश आहे. तेव्हा ललिते तू पैज हरलीस !

ललिताही काही कमी नव्हती. ती म्हणाली, हे कृष्णा, मी तुझी लीला जाणली. पण एक गोष्ट लक्षात ठेव. अशी लीला करून त्यात तू यशस्वी होण्यामध्ये माझा अर्धा वाटा आहे. कारण मीच तुला स्वतःहून महालात घेऊन आले. नाही तर तू कसा आत येऊ शकला असतास?

या गोष्टीचा बोध असा आहे की , ईश्वराला आपल्या अंतर्मनात प्रवेश करू द्यायचा की नाही हे भक्ताने ठरवायचे असते. भक्ताने जर नामस्मरण करून परमेश्वराला स्वतःहून आवाहन केले नाही तर परमेश्वर कशाला भक्ताच्या वाटेल जाईल? परंतु त्याचबरोबर एक गोष्ट आपल्याला वरील कथेत कळते की जेव्हा ईश्वराला एखादा भक्त आपल्या कृपेस पात्र आहे असे वाटले तर ईश्वर सर्व परिस्थितीच अशी निर्माण करतो की भक्ताने आपल्या अंतर्मनाची कवाडे स्वतःहून उघडावीत आणि ईश्वराला आत प्रवेश करू द्यावा. देव भक्तांचा भुकेला हे वचन सार्थच आहे, हाच या कथेचा अर्थ आहे. कारण या परीक्षेनंतर ललितेला पूर्ण स्वरूपात कृष्ररूपाची ओळख पटली. ती कृष्णचरणी लीन झाली. त्याच्या लीलेने भारावून गेली. ती कृष्णमयच होऊन गेली. तिचे अस्तित्वही कृष्णरूपात मिसळून गेले. ती राधाकृष्ण यांची अंतरंग सखी झाली.

ती कृष्णाला नेहेमीच भोजनानंतर तांबूल - म्हणजे विडा देत असे असा उल्लेख मिळतो. एकप्रकारे ईश्वरी सेवेचा - अंतिम चरण तिने गाठला होता असा याचा अर्थ आपण लावू शकतो.

तिच्या मृत्यूनंतरही तिची कृष्णभक्ती कायमच राहिली. इतकी की तिचा पुढचा जन्म स्वामी हरिदास यांचा झाला; जे जन्मताच कृष्ण भक्त होते. कृष्णाच्या मधुर, स्वर्गीय बासरीच्या सुरांचा एक अंश गळ्यात घेऊनच स्वामी हरिदास जन्माला आले आणि एक अतुलनीय कृष्णभक्त गायक म्हणून प्रसिद्ध झाले.

**- सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# म्हणींचे म्हणणे

## मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधावी?

खरंतर ना पूर्वीच्या काळी लोकांनी अनुभवातून साहित्य निर्मिती केली. अन् हे साहित्य मौखिक रूपाने पुढच्या पिढीला मिळत गेलं. अखंड घटना किंवा प्रसंग सांगण्यापेक्षा चार शब्दात सारांश सांगावा एवढाच त्याचा हेतू. म्हणून या म्हणींची निर्मिती झाली..काही काही वेळा चटकन भावार्थ सांगून जातात या म्हणी.

नीरजा पटपट स्वयंपाक आवरून नोकरीवर जाण्यासाठी लगबगीनं बाहेर पडली. आज जरा जास्तच वेळ झाला होता. आताची बस चुकली तर लेटमार्क ठरलेला. शिवाय बोलणी खावी लागतील ती वेगळीच ! बरं इतकं करूनही चारचौघात एखादा टोमणा बसेल याचीही खात्री ! पाय भराभर टाकत विचारात गुंगलेल्या नीरजाला ऑफिसचा सगळा अवतार आठवला. जळ्ळी मेली आजच मिटिंग ठेवलीय नव्या प्रॉडक्टची ! स्वतःशीच चीडचीड करत नीरजा स्टॉपवर येऊन उभी राहिली. मनातून ऑफिसमध्ये, तोंडात देवाचं नाव आणि शरीराने बसस्टॉपवर. अशी त्रिस्थळी यात्रा चालली होती तिची.

देवा, आता ही बस तरी वेळेवर येऊ दे ! देवाचा धावा करता करता समोरून बस येताना दिसली. हुश्श!! आता बसायला जागा नाही मिळाली तरी चालेल पण बस थांबू दे फक्त !

इतक्यात ब्रेक लावत ड्रायव्हरने बस थांबवली. पटपट इतर पॅसेंजरबरोबर नीरजा बसमधे चढली. खांद्याची पर्स संभाळत तिकीट काढून जागा मिळेल तिथे उभी राहिली. विचारांची बस मात्र केव्हाच ऑफिसमधे पोहचली. दारात बसलेला रमेश दिसला. शिपाई कमी वॉचमन जास्त. चोमडा नुसता! बाहेर काही झालं तरी लगेच जाऊन केबिनमधल्या त्या नखरेल नारीला- शमिका गुप्तेला सांगतोच. याच्या लेखी आपण अगदी कर्तव्य परायण, प्रामाणिक व जबाबदार नोकर !

हं... स्वतःशीच नाक मुरडत नीरजा आत गेली. आजुबाजुची चार टेबलं आणि हिचं पाचवं टेबल. खजिनदार नावाची पाटी टेबलावर दिमाखात ठेवलीय पण ती पाटी तेवढीच दिमाख मिरवते. बाकी यांच्या मात्र कठपुतळ्या. त्या महामायेसमोर काही चालतच नाही मुळी. खडूस... ! तोंडाने पटकन बोलून गेली. बसमधे शेजारी उभारलेल्या व्यक्तीने प्रश्नार्थक नजरेने बघितलं. इतक्यात बस गचकन थांबली. म्हसोबा मंदिर उतरणारे उतरा पटपट. असा कंडक्टरने आवाज दिला तेव्हा ही भानावर आली. हातातली पर्स संभाळत पटकन बसमधून उतरली, अन् ८० च्या स्पीडने ऑफिसच्या रस्त्याला लागली. ही मधली दहा मिनिटेसुध्दा अगदी अंगावर येतात. ऑफिसला पोहचली. दारात रमेश होताच. पण पंचिंग वेळेच्या आधी येऊन धडकल्यामुळे नीरजाने निश्वास सोडला. पहिले सोपस्कार झाले अन् टेबलावर येऊन बसली. Computer ऑन केला अन् कालच्या कामाची पुढची सुरुवात सुरू केली.

आज क्षमा, स्वाती, नंदू, भोल्या सगळे आले होते. आल्यावर हाय हॅलो करून आपआपल्या टेबलावरची कामे सुरूही केली होती. घड्याळाचा काटा पुढे जात होता. पण बॉसच्या केबीनमध्ये काहीच हालचाल जाणवत नव्हती. रमेश पण निवांत बसून होता. एकीकडे टाईप करत आकडे मारत मारत नजरेने न्याहाळणे सुरूच होते. तेवढ्यात नंदू समोर आला. म्हणाला, 'नीरजामॅम, काल एका पार्टीने बिल दिलं होतं त्याची रिसीट, पोचपावती तुम्ही करून देते म्हणाला होतात. केली असेल तर देता

का? बॉसची सही घेऊन जाता जाता पार्टीला देईन.' नीरजा ओके म्हणाली अन् फाईल शोधायला लागली. टेबलावरची फाईल गेली कुठे? काल काम संपवून इथेच तर ठेवली होती. मॅमची सही झाली की कपाटात ठेवायची. आजच तर सही घ्यायची होती. ते काम पूर्ण झाले म्हणून जरा तरी स्माईल दिले असते मॅमनी की रजेचा अर्ज देता आला असता. कंटाळा आलाय गेले आठवडाभर पळपळ पळून. जरा चेंज म्हणून दोन दिवस आराम करणार होते... मनात लाख विचार. हात फाईल शोधतायत... डोळे कपाट, टेबल, खुर्ची इकडे शोध घेतायत. मन मात्र पुढच्या प्लॅनचा बट्ट्याबोळ होणार म्हणून एक एक क्षणांनी उदास होत चाललय. तिचं तिलाच काही उमजेना. 'नंदू, ए नंदू, अरे ती फाईल मिळतच नाही. तुझ्या टेबलवर गेली नाही ना बघ जरा.'

तो रमेश तडमडत असतो. त्यालाच विचारते, असं म्हणत पुटपुटत ती रमेशकडे गेली. त्याला हाक मारत म्हणाली, 'काल माझ्या टेबलवर एक फाईल ठेवली होती जाताना, ती कुठाय? त्याला वर लाल मार्करने स्टार केला होता. ती आज सहीसाठी द्यायची होती. काही बदल करायचे होते. आकडेवारी पुन्हा लिहायची होती. बघितलीस का कुठे?'

इतकी घायकुतीला आली न ती. रमेश शांतपणे म्हणाला, 'ती ऑफिस बंद करता करता बॉस मॅडमच्या टेबलवर ठेवली. मला वाटलं तुमचं काम पूर्ण झालय म्हणून तुमी माझ्याकडे दिलीत.'

'अरे देवा, तुला कुठे मी दिली? आता ती केबिनमधून आणून दे. मला काही माहिती नाही. मी पूर्ण न करता तुझ्याकडे कशाला देईन? टेबलवर ठेवली होती कपाटात ठेवायची म्हणून.'

एवढ्यात दार वाजलं अन् शमिका आत येऊन सगळ्यांना गुड मॉर्निंग म्हणत केबिनमधे गेली.

रमेश गप्प. नंदू हे सगळं ऐकत होता. आता तोही गप्प. बाकीचे सगळे आधी यात होते. आता अलिप्त. नीरजा रमेशला दटावत होती. 'जा, आणून दे फाईल.' रमेश हात वर करून मोकळा.

परमेश्वरा ! आता केबीनमधे जाऊन ती फाईल कशी आणू? याच विचाराच्या ताणाखाली नीरजा टेबलवर आली. आता केव्हाही बोलावणं येईल.

सगळे बिथरलेले. 'मांजरीच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी?' ती फाईल अजून तयार व्हायचीय सांगायचं कुणी? बरं एवढं करून मांजर सगळ्या उंदरांना फस्त करणार लेक्चर देऊन ते वेगंच. देवा आज काही खरं नाही.

इतक्यात बेल वाजली अन् रमेश केबिनमधे गेला. इकडे नंदू खुणा करून विचारत होता. हळूच आवाज काढत विचारले, 'फाईल कशी घेणार?' त्याचं वाक्य पुरं होतय न होतय तोपर्यंत रमेश बाहेर आला. नीरजाला आत बोलवलय सांगितले. खाली मान घालून जायला तर हवच.

थोडा वेळ गेला. नीरजा फाईल हातात घेऊन बाहेर आली. चेहऱ्यावर अजिबात ताण नव्हता. हसू होतं.

केबिनचा दरवाजा बंद झाला, अन् नीरजा थोडे जोरात म्हणाली, 'म्यॅंव ! म्यॅंव !! म्यॅंव !!! कारण दबक्या पावलाने हळूच फाईल आणलेय. अन् मांजर मागील थकबाकीबद्दलच विचारत होती. फाईल दिसली नाही तिला ! गठ्यातून हळूच हलवली आहे ! सगळे हसायला लागले. एक सुरात. सगळे म्यॅंव... ओरडले अन् रिलॅक्स झाले. शमिका बाहेर आली अन् म्हणाली, 'ऑफिसमधे मांजर आलय का? नाही, आत मला आवाज आला.' सभोवार नजर फिरवली अन् आत गेली.

केबिनचा दरवाजा बंद झाला. म्यॅंव... म्यॅंव असा आवाज काढत सगळे हसत आपापल्या टेबलावर गेले.

**– वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

**अध्याय ३ : कर्मयोग**

**श्रीभगवानुवाच ।**

**मिष्टान्न भोगे करूनी । जया देवास अग्निमुखे समर्पुनी ।**
**ते देव प्रीतिभावे आंगीकारूनी ।**
**फळे देतील कल्पनेचे ।।१२।।**
यज्ञ–तुष्ट तुम्हां देव भोग देतील वांछित ।
त्यांचे त्यांस न देतां ज़ो खाय तो एक चोर चि ।।१२।।

**यज्ञ कर्मे न करितां । तो तस्कर म्हणावा तत्त्वता ।**
**यज्ञेविण कर्म आवरतां । वृथा जाय ।।**
**जे यज्ञ करुनी शेष भक्षिती ।**
**तयांची सर्व किल्मिषें नासती ।**
**जे उदारार्थ पचउनी भक्षिती ।**
**तितुके भोगिती पाप देखा ।।१३।।**
यज्ञांत उरलें खाती संत ते दोष ज़ाळिती ।
रांधिती आपुल्यासाठीं पापी ते पाप भक्षिती ।।१३।।

**अन्नापासुनी होती भूते । ते ध्यान पर्जन्ये निपजे बहुते ।**
**तो पर्जन्य यज्ञाचेनी सुकृते ।**
**तो यज्ञ कर्मापासुनी ।।१४।।**
अन्नापासुनी हीं भूतें पर्जन्यातूनि अन्न तें ।
यज्ञें पर्जन्य तो होय यज्ञ कर्मामुळें घडे ।।१४।।

**ते कर्म ब्राह्मणापासुनी । तो ब्रह्मा अक्षरिहुनी ।**
**या कारणे ब्रह्मा अझुनी ।**
**नित्य यज्ञकर्म करितसे ।।१५।।**
प्रकृतीपासुनी कर्म ब्रह्मीं प्रकृति राहिली ।
ऐसें व्यापक तें ब्रह्म यज्ञांत भरलें सदा ।।१५।।

**ऐसे ब्रह्मच की प्रतिष्ठिले ।**
**ते जन्मा येउनी नाही प्रतिपादिले ।**
**ते तामस वृक्ष जन्मले । भूमिभार होऊनिया ।।१६।।**
प्रेरिलें हें असें चक्र ह्या लोकीं ज़ो न चालवी ।
इंद्रियासक्त तो पापी व्यर्थ जीवन घालवी ।।१६।।

**जे आत्मरतीचे ठाईं राहिले । आत्मसुखे तृप्त जाले ।**
**स्वस्वरूपीं विश्रामले । तया कर्मे न लगती ।।१७।।**
परी आत्म्यांत ज़ो खेळे आत्मा भोगूनि तृप्त ज़ो ।
आत्म्यामध्यें चि संतुष्ट त्याचें कर्तव्य संपलें ।।१७।।

**तया कर्में न करूनी कांही । परस्परे गुंतले नाही ।**
**तैसेचि सर्व भूतांच्या ठायी ।**
**नेमिती आश्रय कोणाचा ।।१८।।**
केल्यानें वा न केल्यानें त्यास भावार्थ सारखा ।
कोणामध्यें कुठें त्याचा न कांहीं लोभ गुंतला ।।१८।।

**या कारणे लौकिकी सतत ।**
**कार्या–कारणे कर्मी असावे किती ।**
**स्वकर्म आचरतां निश्चित । पुरुषार्थ पावती ।।१९।।**
म्हणूनि नित्य नि:संग करीं कर्तव्य कर्म तूं ।
नि:संग करितां कर्म कैवल्य–पद पावतो ।।१९।।

## शब्दकोडे माहे एप्रिल २०२३

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | X | ५ | |
| ६ | | X | ७ | | ८ | | X |
| | X | ९ | | X | | X | १० |
| X | ११ | | X | १२ | | १३ | X |
| १४ | | | १५ | | X | १६ | १७ |
| १८ | | | | X | १९ | X | |
| २० | | X | २१ | | | | X |
| X | | X | २२ | | | X | २३ |
| २४ | X | २५ | | | X | २६ | |

**आडवे शब्द :**

१. लहान मुलांना झोप येण्यासाठी म्हणायचे गाणे, ५. 'XX ने बना दी जोडी' (अभिनेत्री अनुष्का शर्माने पदार्पण केलेला २००८ सालचा सुपरहिट हिंदी चित्रपट), ६. हत्ती, ७. सारासार विचार, ९. पालखी वाहणारा सेवक, १०. भूमी, ११. डावा, १२. १४ ओळींची कविता, १४. अनुमती, १६. पावसाळ्यात उगवणारे औषधी झुडूप; ज्याची २ पाने समोरासमोर व देठविरिहित असतात, १८. मैदानी व्यायाम, कवायत, २०. चाबकाचा फटकारा, गुरांच्या रोगाची साथ, २१. मधुमक्षिका, २४. मराठी वर्णमालेतील शेवटचा स्वर, २५. 'झाकण' ला हिंदी प्रतिशब्द, २६. गाय.

**उभे शब्द :**

१. घरापुढची मोकळी जागा, २. समुद्राच्या लाटांचा आवाज, ३. आचार्य विनोबा भावे यांनी भाषांतरित केलेला ओवीबद्ध ग्रंथ, ४. होडी, मचवा, नांव, ५. 'XX ही स्वर्गाहून लंका' (गाण्याची ओळ), ८. अंगठ्याजवळचे हाताचे बोट, ९. मंगळवार, ११. उत्तराधिकारी, १२. पिकाचा हंगाम, संपन्नता, १३. फिकीर, काळजी, १४. झिम्मा फुगडी घालताना काढण्याचा आवाज, १५. नमस्कारासाठी कमरेत वाकलेला, १७. कर्ण, १९. महिरप, २३. राशी कुंडलीत ९ या आकड्याने दर्शवली जाणारी रास.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. जागतिक ग्रंथ दिन/पुस्तक दिन दरवर्षी कधी साजरा करतात?

२. कोणती कॉफी इटलीत उन्हाळ्यात अधिक प्यायली जाते?

३. कोणत्या मानसशास्त्रज्ञाने 'Learning Disability' हा शब्द प्रथम व कधी वापरला?

४. कोणती पाककृती ओरिसात पावसाळ्यात जास्त बनवली जाते?

५. म्यानमारमधील 'तिंज्या' सणात एकमेकांवर पाणी उडवण्याच्या कार्यक्रमाला काय म्हणतात?

६. पोलिओ रोगाचे मूळ कोणी व कधी शोधून काढले?

७. रोज २ चमचे मोड आलेले मेथी दाणे खाल्ल्याचे फायदे कोणते?

८. अंदमान येथील कोणत्या आयलंडचे नाव 'पोर्ट ब्लेअर' असे करण्यात आले? व कधी?

९. सुईच्या टोकाला दोरा ओवण्यासाठी असलेल्या छिद्राला काय म्हणतात?

१०. 'स्टॅच्यू ऑफ लिबर्टी' हा पुतळा अमेरिकेला कधी व कोणी भेट दिला?

(उत्तरे अन्यत्र पहा.) **– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## शब्दकोडे माहे मार्चचे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ स | X | २ न | ३ कु | ल | X | ४ ध | X |
| ५ म | ध | X | ऱ्हा | X | ६ जा | न | ७ तं |
| र | X | ८ ख | ड | ९ त | र | X | बू |
| १० भू | ११ पा | ळी | X | १२ प | ट | १३ का | X |
| १४ मी | न | X | १५ स | न | X | १६ दं | १७ ड |
| X | १८ फु | टी | र | X | १९ क | ब | र |
| २० उ | टी | X | २१ स | रा | स | री | X |

शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक बाविसावा)

दशक्रिया विधीची सगळी तयारी होत आली. शिधा-सामग्रीचीपण आणि मनाचीपण. याबद्दल मुक्तीला समजावून सांगून तिच्या मनाची तयारी करून घेण्याचं मोठं काम सोपानानं केलं होतं. म्हणूनच निवृत्ती-ज्ञानेश्वर निश्चिंत होते. एवढ्या कोवळ्या वयातल्या सोपानाच्या समंजसपणाचं, समजूतदारपणाचं त्यांना कवतिक वाटत होतं. विनायकबुवा आणि कावेरीअक्का दोघंही मदतीला तत्पर होतीच. गल्लीत कुजबुज सुरू झाली आणि ती गावभर पसरली. निवृत्ती आणि त्याची भावंडं आपल्या आई-वडिलांचा दशक्रिया विधी करणार आहेत, हे गावात वणव्यासारखं पसरलं आणि लोकांत चर्चेला उधाण आलं. त्यातही पुन्हा दोन तट पडले होते. एका तटानं मुलांची बाजू घेतली होती, ते म्हणत होते, ''आई-वडिलांनी प्रायश्चित घेतलेलं आहे, तर मुलांना जरूर हक्क आहे, की त्यांना अन्न-पाणी द्यावं.'' तर दुसरा तट म्हणत होता की, पापी, अधर्मी माणसाच्या मुलांनासुद्धा हे श्राद्धकर्म करायचा अधिकार नाही. चर्चेवर चर्चा वाद-प्रतिवाद सगळं चाललं होतं. जणूकाही विठ्ठलपंत-रुक्मिणी आणि त्यांचा परिवार यांना स्वत:चं, स्वत:च्या परिवाराचं, स्वत:च्या परिवारापुरतंच असं अस्तित्व नव्हतंच. विठ्ठलपंत-रुक्मिणी आणि त्यांचा परिवार म्हणजे जणू सार्वजनिक मालमत्ता होती, की कुणीही उठावं आणि काही बोलावं.

हे सगळं येता-जाता निवृत्ती-ज्ञानेशाच्या कानांवर पडत होते; पण त्यांनी मनावर संयम ठेवला होता. प्रकांडपंडित आणि वेद-शास्त्रं-पुराणं-उपनिषदं यांचा गाढा अभ्यास असलेल्या आपल्या वडिलांना आणि पतिव्रता, असलेल्या, रामायण-महाभारताची, संस्कृताची जाण असलेल्या आपल्या आईला अन्न-पाणी देताना आपली मन:स्थिती संयत आणि समतोल असली पाहिजे, अशी त्या दोघांच्या मनाची धारणा होती. म्हणूनच आपल्या मनावरचा संयम त्यांनी ढळू दिला नाही. सगळी तयारी झाली होती; पण किरवंत कोणी मिळत नव्हतं. श्राद्ध चालवायला कोणीच तयार नव्हतं. काही जण मनातून तयार असूनही धर्मसभेच्या भीतीनं नाही म्हणत होते आणि दुसरं म्हणजे तीर्थरूप म्हणूनही कोणी जेवायला यायला तयार नव्हतं. त्याही मागं हेच कारण होतं; पण ही फिकीर विनायकबुवांना आणि कावेरीअक्कांनाच होती. निवृत्ती-ज्ञानेशाला ही फिकीर नव्हतीच. चिंता तर अजिबात नव्हती. त्यांची मनाची धारणा ठाम होती. निश्चय पक्का होता. ध्येय निश्चित होतं. प्रयत्नांत पराकाष्ठा होती. परिश्रमात अथकता होती आणि साध्य साकारणार होते. आता फक्त प्रतीक्षा होती त्या दिवसाची.

...आणि तो दिवस उजाडला. संस्कृत आणि संस्कृती शिकवणाऱ्या विठ्ठलपंतांनी निवृत्ती-ज्ञानेशाला शास्त्रोक्त संस्कार आणि अशास्त्रोक्त संस्कारांचीही ओळख करून दिली होती. म्हणूनच ही सगळी भावंडं आई-वडिलांना अन्नोदक द्यायला सिद्ध झाली होती. दिवसाचा दुसरा प्रहर सुरू झाला. पहिल्या प्रहरात त्या दिवशीही तिघांनी ज्ञानसाधना केली. निवृत्ती-ज्ञानेश्वर गंगेच्या घाटावर गेले, तर सोपानानं घरीच राहून मुक्तीच्या सोबतीनं ज्ञानसाधना केली. दुसरा प्रहर संपला. कावेरीअक्का विनायकबुवा यांना बरोबर घेऊन निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि

मुक्ता गंगेच्या घाटावर गेले. शिधा-सामग्री सगळंच आणलं होतं. सगळ्यांनी गंगेत अंघोळी केल्या. कावेरीअक्कांनी मुक्ताला मदतीला घेऊन तीन दगडांची चूल मांडली आणि गाडग्यात भात टाकला. तोपर्यंत विनायबुवांच्या मदतीनं निवृत्ती-ज्ञानेशानं सगळी मांडामांड केली. नदीच्या त्या घाटावर बरेच लोक ये-जा करत होते; पण बरेचसे त्यातले इथं चाललेला श्राद्ध विधी बघायला आले होते. कोणीही भिक्षुक किंवा किरवंत नसताना ही मुलं हा श्राद्ध विधी कसा करतात, याबद्दल सर्वांना अनावर उत्सुकता तर होतीच; पण त्यातले काही तर कशी फजिती होते, हे बघण्यासाठीच आले होते. त्यातच विठ्ठलपंत-रुक्मिणीबाई, दोघांचंही शव सापडलं नव्हतं. त्यामुळे अग्निसंस्कार केला गेलाच नव्हता. त्यामुळे रक्षा विसर्जन किंवा अस्थी विसर्जनाचा प्रश्नच नव्हता आणि आता अस्थीच नसल्यामुळे हा दशक्रिया श्राद्ध विधी ही मुलं कसा करणार आहेत, याबद्दल जमलेल्या लोकांच्यात तर्क-वितर्क चालले होते.

निवृत्ती आणि ज्ञानेश्वर मात्र शांतपणे, एकचित्तानं सामग्रीची मांडामांड करत होते. सोपान त्यांना मदत करत होता; पण मदतीपेक्षा तो प्रश्नच अधिक विचारत होता आणि सामग्रीची मांडामांड करता-करता निवृत्ती आणि ज्ञानेश्वर त्याच्या प्रश्नाला उत्तरही देत होते. मुक्तीची समजूत घालणारा सोपान नाना प्रश्न विचारत होता आणि ते दोघं शांतपणे त्याची उत्तरं देत होते. सोपानाच्या प्रश्न विचारण्यातून त्याची अनन्यसाधारण बुद्धिमत्ताच प्रतीत होत होती. सगळी मांडमांड चालली होती. मध्येच सोपानानं विचारलं, ''दादा, 'जातस्यहि ध्रुवो मृत्युर्धृवं जन्म मृतस्यच' अर्थात 'जन्मास आलेल्या व्यक्तीस मरण आणि मृत झालेल्या व्यक्तीस जन्म, या गोष्टी अटळ असतात,' असं श्रीमद्भगवतद्गीता सांगते. मग हा श्राद्ध विधी का करायचा?'' सोपानाच्या या प्रश्नानं काही क्षण तिथं शांतता पसरली; पण सोपानाच्या या प्रश्नाला उत्तर देणं भाग होतं. निवृत्तीनं ज्ञानेशाकडे पाहिलं.

ज्ञानेशानं त्या नजरेतला अर्थ ओळखला. ज्ञानेशानं सोपानाच्या खांद्यावर हात ठेवला. म्हणाला, ''सोपाना, 'श्रद्धया क्रियेत यत् तत् श्राद्धम' असंही वेदात सांगितलं आहे. 'वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्याति नरोऽपराणि तथा ! शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयति नवानि देही !' असंही श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलं आहे. अर्थात 'ज्याप्रमाणे माणूस जुनी वस्त्रं टाकून नवी वस्त्रं धारण करतो, त्याप्रमाणे जीवात्मा जुन्या शरीराचा त्याग करून नवीन शरीर धारण करतो.' म्हणजेच सोपाना मृत्यूही एक अटळ; परंतु सुंदर गोष्ट आहे. आपले पालक सचेतन असताना त्यांच्याबद्दलचं प्रेम, आदरभाव, स्नेह आपण त्यांची काळजी घेऊन, सेवा करून व्यक्त करतो. सोपाना, मनुष्य मृत्यू पावल्यानंतर नष्ट होतं ते शरीर; पण आपलं त्या व्यक्तीबद्दलचं प्रेम, आदर, स्नेह या भावना तर नष्ट होत नाहीत ना? या भावनाच त्यांची स्मृती चिरंतन ठेवायला आपल्याला मदत करतात. श्राद्धविधी करून त्यांना अन्नोदक देऊन आपण त्यांच्याविषयी आपल्या याच भावना कायम आहेत, त्यांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या स्मृती आपल्या हृदयात चिरंतन आहेत हेच आश्वासक वचन देतो. यासाठी हा श्राद्ध विधी करायचा असतो.''

ज्ञानेशाच्या खुलाशानं सोपानाचं समाधान झालेलं दिसलं. निवृत्तीला वाटलं हा आता शांत राहील; पण क्षणभरच. सोपानानं लगेच पुढचा प्रश्न विचारला, ''हे मला समजलं; पण त्यासाठी अन्नोदक का द्यायचं?'' आता उत्तर देण्याची वेळ निवृत्तीची होती. ''हे बघ बाळ, एका जन्माचा अंत झाला, की, आत्मा दुसऱ्या देहात प्रवेश करतो. एका सूक्ष्म देहातून दुसऱ्या जड देहात प्रवेश करण्यापर्यंतचा या पुण्यात्म्याचा प्रवास सुखकर व्हावा, म्हणून त्याला

प्रतीक रूपानं अन्नोदक द्यायचं असतं. सोपाना हे सगळं श्रद्धेचं व्याकरण आहे. शेंदूर लावलेल्या छोट्या दगडामध्येही आपण देवत्व मानतो ना? तसंच आहे हे. एकदा मनात श्रद्धेची प्राणप्रतिष्ठा केली की, सगळी उत्तरं सोपी होऊन जातात.'' निवृत्तीचं बोलणं सोपान लक्षपूर्वक ऐकत होता. ते ऐकत असतानाच त्याच्या मनात पुढचा प्रश्न निर्माण झाला होता. तो त्यानं लगेचच विचारला, ''पण दादा, हे अन्नोदक त्या जीवात्म्यापर्यंत कसं पोहोचणार?'' इतका वेळ काही बुद्धिनिष्ठ प्रश्न विचारणारा सोपान या प्रश्नानं जणू पुन्हा लहान झाला. निवृत्ती काही बोलणार, तोच विनायकबुवांनी त्याला हाक मारली आणि सोपानाच्या या पुढच्या सर्व शंकांचं निवारण करण्याची जबाबदारी ज्ञानेशावर टाकून निवृत्ती विनायकबुवांकडे गेला.

ज्ञानेशानं सोपानाकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती आणि नजरेत अपेक्षा. ज्ञानेशाला आता प्रश्नाचं उत्तर देणं भागच होतं ''सोपाना, नीट लक्ष देऊन ऐक. पृथ्वीतलावर मृत होणाऱ्या सगळ्या माणसांचे पितर हे वसु-रुद्र किंवा आदित्य स्वरूप होतात. विश्वाच्या नियमनात यम, अर्यमा आणि इंद्र या तीन प्रधान देवता आहेत. त्यापैकी यम या देवतेच इहलोकी सचेतनावर आणि अचेतनावर नियमन असतं. म्हणून श्राद्ध विधीमध्ये यम ही देवता असते. पितृलोकावर अयमाचं अधिराज्य असतं. श्राद्ध विधीमुळे आत्मा पितृलोकात जातो. म्हणून श्राद्ध विधीला अर्यमा ही देवताही उपस्थित असते. श्राद्धात आपण पितरांना अन्नोदक अर्पण करतो. त्या हविर्भागातील त्यांचा घास वसु-रुद्र आणि आदित्यस्वरूपी सर्व पितरांपर्यंत पोहोचवणं, ही अर्यमाची जबाबदारी असते. श्राद्धातून वाहिलेल्या हविर्भागामुळे तृप्त होऊन तो जीवात्मा देवलोकी प्रवेश करतो किंवा पुनर्जन्म होऊन इहलोकी परत येतो. देवलोकी इंद्राचं अधिराज्य असतं. तिथं तो तृप्त झालेला पुण्यात्मा आनंदानं वास करतो. हे कार्य इंद्रदेव करतो. तिथं या हविर्भागातला त्याचा घास त्याला इंद्रदेवाकरवी अमृतरूपानं प्राप्त होतो व तो पुण्यात्मा अंतिमत: देवपदाला पोहोचतो आणि तो पुण्यात्मा जर पुनर्जन्म घेण्यासाठी इहलोकी, म्हणजेच भूलोकी आला, तर या हविर्भागातला त्याचा घास त्याला अन्नरूपात प्राप्त होतो. त्यामुळे श्रद्धेनं अर्पण केलेलं अन्नोदक त्या जीवात्म्यापर्यंत पोहोचतच पोहोचतं. कळलं?''

सोपाना मनोमन आनंदला. ''होऽऽऽ !'' असा मोठ्ठा होकार त्यानं दिला. त्याला ज्ञानदादाची, कोणत्याही शंकेचं समाधान विस्तारानं करण्याची ही सवय फार आवडायची. आता त्याचं पूर्ण समाधान झालं होतं. तोही आता शांतपणे सामग्रीची मांडामांड करू लागला. तोच इतका वेळ कावेरीअक्कांसमवेत असलेली मुक्ता तिथं पळत आली. त्या वेळी ज्ञानेश्वर द्रोणात काळे तीळ ठेवत होता. ते बघून मुक्तीला नवल वाटलं. ''अक्काऽऽ ! हे कसले तीळ? तीळ तर पांढरे असतात ना? मग हे काळे कसे झाले? सोपानदादा, तू त्यावर अबीर सांडलास का? तसंच असणार ! आता ते तीळ पांढरे कसे होणार?'' मुक्तीच्या शंका, प्रश्न आणि तर्क सुरू झाल्यावर सोपनानं कपाळावर हात मारला, तर त्याचाही तिला राग आला. तिनं सोपानाला जीभ बाहेर काढून वेडावून दाखवलं आणि म्हणाली, ''तुला विचारतच नाहीय मी ! मी ज्ञानादादाला विचारते आहे. हो किनई रे ज्ञानादादा?'' यावर काय बोलावं हे न समजून ज्ञानेशानं होकारार्थी मान हलवली. तर लगेच मुक्तीनं, ''मग सांग ना रे हे तीळ काळे कसे ते? आणि हे इथं कशाला आणलेत?'' असा पुढचा प्रश्न केला.

(क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# मुलांचे करिअर आणि पालकांची मानसिकता

करिअर म्हणजे काय? या शब्दाची व्याख्या कुणी सांगू शकेल का अगदी थोड्या शब्दात? खरे पाहिले तर करिअर या शब्दाचा शब्दशः अर्थ कारकीर्द असा होतो, परंतु या अर्थातून आपल्याला नेमके खरे काय ते, काहीच कळत नाही. त्यामुळेच माझ्या मते करिअर म्हणजेच कारकीर्द या शब्दाचे गरजेनुसार, परिस्थितीनुसार अथवा वयानुसार वेग-वेगळे अर्थ होऊ शकतात आणि ते व्हायलाच हवे.

जर ० ते ५ वर्षापर्यंतच्या चिमुकल्यांबद्दल बोलायचे झाले तर, मोठेपणी त्यांचे करिअर तसेच व्यक्तिमत्व चांगले घडले पाहिजे यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करण्याचा हाच योग्य काळ असतो. बालपणी या लहानग्यांना आई-वडील, आजी-आजोबा अथवा पालक यांच्या मायेचा स्पर्श, मायेची ऊब सातत्याने मिळणे कधीही चांगले. कारण याच काळात या लहानग्यांच्या मेंदूची वाढ ही खूप जोमाने होत असते आणि या मायेच्या स्पर्शज्ञानातूनच त्यांच्या मेंदूची वाढ खूप चांगल्या प्रकारे होते. वयाच्या या सुरवातीच्या काळात मेंदूची जशी जडणघडण होते, त्यानुसारच मोठे झाल्यावर या लहानग्यांचे व्यक्तिमत्व तसेच स्वभाव ठरतो. म्हणूनच म्हणतो की, आपल्या लहानग्यांना चांगले करिअर द्यायची तुमची इच्छा असेल तर, या वयात त्यांना जास्तीत जास्त वेळ दिला पाहिजे. त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या पाहिजेत. त्यांना मांडीवर घेऊन थोपटायला पाहिजे. त्यांना दररोज प्रेमाने मिठी मारली पाहिजे. डोक्यावर हात फिरवून त्यांची विचारपूस केली पाहिजे. तसेच या लहानग्यांनी सतत प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांची एखाद्या गोष्टीबद्दलची जिज्ञासा वाढली पाहिजे अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. या स्पर्शज्ञानातून, स्पर्शाच्या संवेदनेतून अथवा संवादातूनच या लहानग्यांची चांगले विचार करण्याची क्षमता निर्माण होते, परिणामी मोठेपणी त्यांचे करिअर घडण्यासाठी मदत होते.

लहान बालगोपालांच्या म्हणजेच ५ ते १० वर्षांच्या मुलांबद्दल बोलायचे झाले तर, त्यांचे उज्वल भविष्य घडायला पाहिजे या हेतूने त्यांना पूरक असलेल्या विविध कृतीकौशल्यांचा विकास बरोबर होतो आहे किंवा नाही याची पडताळणी करणे (e.g. Fine Motor Skills, Gross Motor Skills, Brain Development, Critical Thinking, Co-ordination Creativity etc.) आणि त्यानुसार त्या चिमुकल्यांना सक्षम बनविणे, हा असाच करिअर या शब्दाचा अर्थ व्हायला हवा. हे करतांना पाल्यांच्या Intelligence Quotient (बुध्यांक) वाढविण्यासोबतच Emotional Quotient (भावनिकता) आणि Social Quotient (समाजशीलता) वाढवायची आहे, हे लक्षात असणं फार गरजेचं असतं. यामुळे पाल्य स्वतःच्या भावना व्यक्त करायला, त्या भावनांचे व्यवस्थापन करायला, त्या भावनांना नियंत्रण करायला तसेच दुसऱ्यांच्या भावनांची कदर करायला शिकतो, समाजामध्ये माणूस म्हणून वावरायला शिकतो. परंतु, आजच्या या धकाधकीच्या जीवनात आपल्या या बालगोपालांकडे अश्या पद्धतीने लक्ष द्यायला वेळ आहे का कुणाकडे? आज रोजी आपण एवढे स्वार्थी झालोय की, आपले स्वतःचे करिअर घडवण्याच्या वैयक्तिक स्वार्थापोटी आपल्याच लहान मुलांकडे दुर्लक्ष करून आपण त्यांचे करिअर धोक्यात आणतोय, हीच खरी शोकांतिका आहे.

त्यानंतर वळूयात ११ ते १७ या वयोगटातील मुलांकडे. खरं पाहिलं तर या वयोगटातील मुलांच्या प्रत्येक पालकाने त्यांच्या मुलांशी स्वतः त्यांचे भविष्य किंवा त्यांचे करिअर कसे असायला पाहिजे, याचे महत्व पटवून द्यायला पाहिजे. आता तुम्ही म्हणाल की, हे अजून काय भलतेच! कारण तुमच्यातील प्रत्येक व्यक्तीला असेच वाटते की, मी माझ्या मुलांकडे परिपूर्ण लक्ष देतो...परंतु हे खरे

नाहीये. खरे बोलायचे झाले तर, या वयोगटातील मुलांना खरी गरज असते ती म्हणजे त्यांची रुची आणि क्षमता ओळखण्याची! परंतु आपण खरंच देतो का या गोष्टीकडे वेळ? याउलट आपण काय करतो? तर सतत त्यांच्या अभ्यास करण्यावरच भर देतो. याचा अर्थ एकच होतो की, आपण त्यांना फक्त पुस्तकी किडे बनवतोय आणि त्यांना घडवायचे विसरतोय. माझे ऐकाल तर, या वयोगटातील मुलांशी प्रत्येक पालकाने हितगुज करायला पाहिजे. त्यांना कुठल्या क्षेत्रात स्वारस्य आहे हे जाणून घेतले पाहिजे. स्वतःच्या करिअरसंबंधी मुलांना त्यांची मते विचारायला पाहिजेत. त्यानंतर त्यांची बौद्धिक आणि वैचारिक क्षमता ओळखून त्यांना त्यांचे आवडते क्षेत्र निवडण्यासाठी मदत करायला पाहिजे. किंबहुना या वयात पाल्याला ही जाणीव झालीच पाहिजे की, त्याने निवडलेले क्षेत्र कुठलेही असले तरी आपले आई-वडील आपले सल्लागार म्हणून आपल्या पाठीशी आहेत. कारण हीच जाणीव तुमच्या पाल्याला त्याने ठरवलेल्या मार्गावर चालण्यासाठी उत्साह आणि बळ देईल. हे जर शक्य झाले, तर नक्कीच त्यांचे उद्याचे भविष्य खूप उज्वल असेल. ते स्वावलंबी बनतील आणि ते उत्तम घडतील. माझ्या मते या वयोगटातील मुलांसाठी हाच खरा अर्थ आहे करिअरचा.

त्यानंतर १८ ते २३ या वयोगटातील मुलांना खरी आवश्यकता असते ती योग्य मार्गदर्शनाची, व्यक्तिमत्व विकासाची, योग्य व्यवस्थापनाची, संभाषण कौशल्याची, आत्मपरीक्षण करण्याची, समोरच्या व्यक्तीचा आदर करण्याची, छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधण्याची, चांगला श्रोता बनण्याची, योग्य लोकांशी ओळख वाढविण्याची, स्वतःला जाणून घेण्याची, परिस्थिती कशीही आली तरी ती योग्य प्रकारे हाताळण्याच्या कौशल्यवाढीची आणि सकारात्मकतेची. हेच खरे वय आहे की, ज्यामध्ये आत्ताच सांगितलेल्या गोष्टींमुळे तुमच्या पाल्याचे भविष्य सुखकर होते. योग्य मार्गदर्शनामुळे तुमचा पाल्य त्याच्या आयुष्याचे योग्य नियोजन करू शकतो. त्यामुळे प्रत्येक पालकाने, आई-वडिलांनी आपल्या पाल्याचे मार्गदर्शक व्हा असे मी म्हणेन, कारण तुमचा हा निर्णय तुमच्या पाल्याला आत्मविश्वास देईल.

आता व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? या प्रश्नाकडे आपण वळूयात. आजच्या स्पर्धात्मक युगात व्यक्तिमत्व विकासाला खूप महत्व प्राप्त झाले आहे, कारण दैनंदिन व्यवहारात तुमच्या पाल्याला इतरांच्या तुलनेत सरस ठरवू शकतो तो फक्त व्यक्तिमत्व विकास. मी याआधीच तुम्हाला सांगितले की, जर तुमच्या पाल्याचे व्यक्तिमत्व उंचवायचे असेल, तर लहानपणी त्यांना तुमच्या प्रेमळ स्पर्शाची, तुमच्या सहवासाची, तुम्ही मिठीत घेऊन प्रेमाची ऊब देण्याची गरज आहे. जर या गोष्टी त्यांना मुबलक प्रमाणात मिळाल्या असतील, तर नक्कीच त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचा स्वभाव चांगला असेल.

आता थोडे बोलूयात कुशल व्यवस्थानाबद्दल. आता कुशल व्यवस्थापन म्हणजे काय? हा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तर आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी वा कौशल्यांमध्ये आपल्या पाल्याला पारंगत करणे, म्हणजेच त्याला कुशल नेतृत्वाचे धडे देणे होय. त्यासाठी तुमच्या पाल्याला थोडे समाजात स्वच्छंदपणे वावरू द्या, स्वतःचे निर्णय घेऊ द्या, तो चुकला तर त्याला समजावून सांगा पण विनाकारण रागावू नका, कारण त्याला ठेच लागेल तेव्हाच त्याला चांगल्या वाईटाची प्रचिती येईल. याच गोष्टींमधून आलेल्या अनुभवांतूनच तुमच्या पाल्याला भरपूर शिकायला मिळेल आणि तो स्वावलंबी बनेल.

२४ वर्ष ते ३० वयोगटातील तरुण-तरुणींच्या मते करिअर म्हणजे फक्त नोकरी किंवा व्यवसाय. त्यामुळे या वयामध्ये त्यांना सांगायची काहीच गरज नसते, कारण ते स्वतःसाठी काय चांगले किंवा काय वाईट? हे पारखण्याइतपत नक्कीच विकसित झालेले असतात. या वयात ते स्वतःचे निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे ज्यांना नोकरी करायची आहे त्यांना नोकरी

आणि ज्याला व्यवसाय करायचा आहे त्याला व्यवसायच करू दिला पाहिजे. परंतु त्यावेळी आपण पालक म्हणून काय करतो?....तर तुला काय कळते, मी तुझ्यापेक्षा जास्त उन्हाळे-पावसाळे बघितले आहेत, तू फक्त नोकरी कर, कारण व्यवसाय केला तर तुला लग्नासाठी कुणी मुलगी देणार नाही, व्यवसाय हा आपल्यासाठी नसून तो फक्त सिंधी-मारवाड्यांसाठीच असतो, आपले नातेवाईक काय म्हणतील? एवढा शिकलास आणि गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून व्यवसाय करतोस? व्यवसाय नाही चालला तर पुढे काय? व्यवसाय चालेलंच याची काय शाश्वती? आपल्या समाजातील किती लोकांनी व्यवसाय केला, पण त्यांना नाही जमला, व्यवसाय जर का आपल्या लोकांना जमला असता, तर सगळ्यांनीच नसता का केला? इत्यादी नाना प्रकारे बोलून आपल्याच मुलांचा आत्मविश्वास उंचावण्यापेक्षा डळमळीत करतो आणि त्याला नोकरीच्या घाण्याला जुंपतो. त्यानंतर त्याच्याकडून अपेक्षा केल्या जातात...त्या म्हणजे पगारवाढीची, प्रमोशनची. त्यानंतर मात्र त्याला बोहल्यावर चढवतो आणि लग्न झाल्यानंतर त्याची सुरू होते ती तारेवरची कसरत. पण या दरम्यान कदाचित त्याचे खच्चीकरण होते...तो आपला आत्मविश्वास, आत्मसन्मान गमावून बसतो. आता मला सांगा, तुमच्या मुलांचे अश्या प्रकारे खच्चीकरण करून तुम्ही पालक म्हणून जिंकणार की हरणार?

आणि त्यातल्या त्यात कुठल्या तरुणाने आपल्या पालकांचे न ऐकता एखादा व्यवसाय सुरू केलाच, तर बरेचसे पालक त्याला सतत विरोध करतात...त्याचा व्यवसायाचा मार्ग कसा चुकीचा आहे? याबद्दलच सतत चर्चा करतात, आजच्या काळात कुठल्याही व्यवसायाला आवश्यक असलेली संजीवनी बुटी म्हणजे भांडवल त्याला वेळेवर उपलब्ध करून देत नाहीत, त्याच्याशी धड बोलत नाहीत, त्याला कुठलेही मार्गदर्शन करीत नाहीत. आता सांगा या गोष्टी ज्या तरुणांच्या वाट्याला येतील, ते कसे काय यशस्वी उद्योजक होणार? त्यातून काही तरुण तावून-सुलाखून निघतात, तर काही तरुण या आयुष्याच्या बाबतीत नाउमेद होऊन...खचून निराशेच्या गर्तेत सापडतात आणि व्यसनाधीन होतात... कर्जबाजारी होतात किंवा आत्महत्या करतात.

आता पालकांनो खरंच विचार करा, आपल्या पोटच्या मुलाला या वळणावर पोहोचविण्यासाठीच का तुम्ही एवढ्या खस्ता खाल्यात? त्यापेक्षा त्याच्या आवडीनुसार त्याला नोकरी अथवा व्यवसाय करू द्या, त्याला हवे ते क्षेत्र निवडू द्या. तो व्यवसाय करीत असेल, तर त्याच्या व्यवसाय वृद्धीसाठी कुठल्या संधी आहेत याबद्दल चर्चा करा...त्याचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने बहरण्यासाठी आवश्यक असलेली नीतिमूल्ये, कौशल्य त्याने कशी आत्मसात करावी, याबद्दल त्याच्याशी सतत संभाषण करा. तुम्ही कुठलीही अपेक्षा न ठेवता त्याचे योग्य मार्गदर्शक बना, किंबहुना त्याचे सहकारी म्हणून त्याचा भक्कम आधार बना. बघा...असे जर खरंच शक्य झाले, तर तुमचा पाल्य त्याच्या आयुष्याकडे नेहमी सकारात्मकतेनेच बघेल आणि त्याच्यासारखा भाग्यशाली कुणीच नाही ही अनुभूती त्याला होईल. आता तुम्हीच ठरवा तुम्हाला तुमच्या पाल्याला या आयुष्याच्या सारिपाटावर कुठे घेऊन जायचे आहे ते! त्याला त्याच्या पद्धतीने करिअर घडवू देऊन स्वावलंबी बनवायचे आहे, की तुमच्या आज्ञेच्या अधीन राहून परावलंबी बनवायचे ते !

त्यामुळे मी तर म्हणेन की, तुमच्या मुलांचे करिअर घडवायचे असेल तर आई-वडील, आजी-आजोबा, पालक यांची मोलाची भूमिका पाल्यांसाठी प्रत्येक वयात फार महत्वाची असते. पालक म्हणून तुमची भक्कम साथ तुमच्या पाल्याला लाभली नाही, तर परिणामी तुमचा पाल्य ज्याप्रमाणे घडायला पाहिजे तसा घडणार नाही. म्हणूनच मी म्हणेन की, पालक म्हणून तुमच्या पाल्याची बलस्थानं नेमकी कुठली आहेत ते ओळखा, तुमच्या पाल्याची रुची ज्या

क्षेत्रात आहे ते जाणून त्याला समर्थन द्या, तुमच्या पाल्याला त्याने निवडलेल्या मार्गावर चालण्यासाठी आत्मविश्वासरूपी बळ द्या, त्यांच्याशी नेहमी सु-संवाद साधा, तुमच्या पाल्याचे मार्गदर्शक बनून त्यांना योग्य रस्ता दाखवा, त्याचे मित्र बनून त्याच्या जीवनात येणाऱ्या काट्यांना दूर करा, त्याच्या आयुष्यात येणाऱ्या संकटांवर मात करून न खचता - न डगमगता सतत पुढे चालत राहण्यासाठी तुमची अनुभवरूपी शिदोरी त्याला द्या. आयुष्य हे एक पुस्तक आहे, त्यातील प्रत्येक पान म्हणजेच वेगवेगळे अनुभव आहेत. ते अनुभव तुमच्या पाल्यांना घेऊ द्या, कारण त्याच अनुभवातून त्यांना बरेचसे शिकायला मिळेल. खऱ्या अर्थाने हे असे झाले तर, तुमच्या पाल्यांचे करिअर, व्यक्तिमत्व खूप चांगले असेल यांत तिळमात्र शंका नाहीये, पण सोबत त्यांच्या उज्वल भविष्याचे शिल्पकार पालक म्हणून तुम्ही स्वतःच बनाल आणि तुम्ही तुमच्या पाल्याला यशस्वी आणि समाधानी आयुष्य जगण्याचा अविस्मरणीय अनुभव देणार हे मात्र नक्की!

– **डॉ. वैभव फाटक,** निसर्गोपचार तज्ञ
counciling for health education
मोबा. ९७६९८३८८७३

## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

## सांगा पाहू उत्तरे

१. जागतिक ग्रंथ दिन/पुस्तक दिन दरवर्षी २३ एप्रिलला साजरा करतात.
२. 'अफोगातो' ही कॉफी इटलीत उन्हाळ्यात अधिक प्यायली जाते.
३. सॅम्युअल कर्क या मानसशास्त्रज्ञाने 'Learning Disability' हा शब्द प्रथम १९६३ साली वापरला.
४. 'आलू चाप' ही पाककृती ओरिसात पावसाळ्यात जास्त बनवली जाते.
५. म्यानमारमधील 'तिंज्या' सणात एकमेकांवर पाणी उडवण्याच्या कार्यक्रमाला 'अटा ये' असं म्हणतात.
६. पोलिओ रोगाचे मूळ ऑस्ट्रियन वैद्यकतज्ञ कार्ल लांडस्टाइनर व एर्विन पॉप्पर यांनी इ.स.१९०८ मध्ये शोधून काढले.
७. रोज २ चमचे मोड आलेले मेथी दाणे खाल्ल्याने रक्तशर्करा व कालेस्टेरॉल नियंत्रित राहण्यास मदत होते.
८. अंदमान येथील 'पॉथम' आयलंडचे नाव इ.स.१७८९ मध्ये 'पोर्ट ब्लेअर' असे करण्यात आले.
९. सुईच्या टोकाला दोरा ओवण्यासाठी असलेल्या छिद्राला 'नेढ' असे म्हणतात.
१०. 'स्टॅच्यू ऑफ लिबर्टी' हा पुतळा अमेरिकेला इ.स.१८८६ मध्ये फ्रेंच सरकारने भेट दिला.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा. ९८१९७७०९७०

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**



# जागतिक महिला दिनाच्या प्रणेत्या

# थेरेसा सर्बर माल्कल !

रशियातून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या या बाईंमुळे जागतिक महिला दिन साजरा होतो.. वाचा त्यांचं कार्य काय आहे.. **थेरेसा सर्बर माल्कल!**

हे नाव तुम्ही पूर्वी कधी ऐकलं आहे का? नाही? आज आपण जो जागतिक महिला दिन साजरा करत आहोत त्याचा आणि या नावाचा घनिष्ठ संबंध आहे. तो कसा ते पहा...

मंडळी, एखादा दिवस साजरा करण्यामागे नेमके काय कारण आहे, त्याचा इतिहास काय आहे, हा पायंडा कुणी पाडला हे जाणून घेणे महत्वाचे असते. जर ही माहिती तुम्हाला असेल तर तो दिवस साजरा करण्याचा आनंद द्विगुणित होतो. आता आजच्या जागतिक महिला दिनाचेच उदाहरण घ्या ना... सर्वांना माहीत आहे की ८ मार्च रोजी महिला दिन आहे, पण याची सुरुवात थेरेसा सर्बर माल्कल या महिलेने केली हे कुणालाच माहीत नाही. दुर्दैवाने थेरेसा आज विस्मृतीत गेल्या आहेत. चला तर मग या दिवसाचे निमित्त साधून आपण त्यांची ओळख करून घेऊया.

थेरेसा यांचा जन्म १ मे १८७४ ला रशियातल्या बार नावाच्या शहरात एका ज्यू परिवारात झाला. जन्मापासूनच ज्यू विरोधी वातावरणात वाढलेल्या थेरेसा यांना आणि त्यांच्या परिवाराला रशियाच्या त्झार राजवटीत प्रचंड त्रास सहन करावा लागला. त्यामुळं अनेक कुटुंबे तिथून स्थलांतर करून अमेरिकेत गेली. त्यात थेरेसा यांचेही कुटुंब होते. १८९१ साली अमेरिकेत दाखल झाल्यावर थेरेसा यांनी इतर ज्यू लोकांप्रमाणे चरितार्थासाठी मिळेल ते काम केले. प्रथम एका बेकरीमध्ये, नंतर एका कपड्यांच्या कारखान्यात त्यांना काम मिळाले. त्यांचा मूळ स्वभाव चळवळ्या आणि बंडखोर असल्याने त्यांचे लक्ष कामगार स्त्रियांच्या प्रश्नांकडे वेधले गेले. थेरेसा फक्त प्रश्न बघून गप्प बसणाऱ्या महिला नव्हत्या. त्या प्रश्न सोडवण्यासाठी काय करता येईल याचा विचार करू लागल्या आणि त्यातूनच कामगार स्त्रियांच्या संघटनेची निर्मिती त्यांनी केली. या स्त्री संघटनेतून स्थलांतरित कामगार स्त्रियांचा आवाज उठवण्याचे काम त्या करू लागल्या.

लवकरच त्यांच्या असे लक्षात आले की, फक्त संघटना चालवून भागणार नाही. महिलांना पुरुषांच्या समान हक्क हवे असतील तर राजकारणात उतरण्याशिवाय पर्याय नाही हे त्यांनी ओळखले. आता त्यांनी कामगार स्त्रियांच्या प्रश्नांसोबतच एकंदरीत स्त्री-पुरुष समानतेवरही लक्ष केंद्रित केले. सोशालिस्ट पार्टीमध्ये प्रवेश करून त्यांनी राजकारणात शिरकाव करून घेतला. त्यावेळी सोशालिस्ट पार्टी ही एकमेव अशी पार्टी होती ज्यात महिलांना प्रवेश मिळत असे. आम्ही स्त्री-पुरुष भेदभाव करत नाही असं त्यांचं ब्रीदवाक्य होतं. यामुळेच थेरेसा सोशालिस्ट पार्टीकडे आकर्षित झाल्या होत्या. परंतु दुर्दैवाने लवकरच त्यांना सत्य समजले की पार्टीचा नारा फक्त दिखाऊ स्वरूपाचा

होता. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांना नगण्य स्थान मिळत असे. थेरेसा यांनी यामुळे निराश न होता असे ठरवले की, पार्टी न सोडता आपली समांतर विचारधारा चालवून आपले ध्येय साध्य करायला हवे. त्यांनी सोशालिस्ट महिलांची एक वेगळी चळवळ सुरू केली आणि महिलांसाठी राजकारणात एक वेगळे स्वतंत्र व्यासपीठ असायला हवे असे जोरदार मत मांडले.

शेवटी सोशालिस्ट पार्टीने त्यांचे म्हणणे मान्य केले आणि अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच महिलांसाठी वेगळे डिपार्टमेंट बनवण्यात आले. त्याच्या अध्यक्षपदी थेरेसा विराजमान झाल्या. मंडळी, त्या काळी ही गोष्ट अजिबात सोपी नव्हती! एक तर महिला, त्यात अमेरिकेबाहेरील स्थलांतरित कामगार ! ही एका नव्या पर्वाची सुरुवात होती!

या पदावर बसून थेरेसा यांनी महिलांच्या हक्कासाठी लढा दिला. त्यातलाच एक हक्क म्हणजे महिलांना मतदानाचा अधिकार! तोपर्यंत अमेरिकेत महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. तो मिळायलाच हवा हा मुद्दा थेरेसा यांनी सर्वांसमोर मांडला आणि बरेच प्रयत्न करून त्यासाठी समर्थन मिळवले. या सोबतच महिलांचे अनेक प्रश्न त्यांनी यशस्वीपणे हाताळले. महिलांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण केली.

थेरेसा यांनी जगाचे लक्ष महिलांच्या समस्यांकडे वेधले जावे म्हणून एक कल्पना मांडली. वर्षातला एक दिवस 'महिला दिन' म्हणून साजरा व्हावा हीच ती कल्पना ! सोशालिस्ट पार्टीने त्यांना या बाबतीत साथ दिली आणि अमेरिकेत पहिला 'राष्ट्रीय महिला दिन' १९०९ साली २८ फेब्रुवारी रोजी साजरा झाला. ही कल्पना नंतर युरोपियन देशांमध्ये सुद्धा पसरली आणि नंतर जगभरात लोकप्रिय झाली. आज सर्वानुमते जगभरात एकाच दिवशी म्हणजे ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' साजरा होतोय या मागे मूळ कारण थेरेसा सर्बर माल्कल या आहेत.

थेरेसा माल्कल यांचे १७ नोव्हेंबर १९४९ मध्ये निधन झाले. एक स्थलांतर होऊन अमेरिकेत आलेली मुलगी ते अमेरिकेच्या राजकारणातील बलशाली महिला असा त्यांचा थक्क करणारा प्रवास होता. त्यांचे निधन झाल्यावर हळू हळू लोक त्यांना विसरले. आज आपण महिला दिन साजरा करतो पण थेरेसा यांचा उल्लेख कुठेही होत नाही हे दुर्दैवी सत्य आहे.

**जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा आणि थेरेसा माल्कल यांना सलाम!**

## शब्द

**शब्दांनीही शब्दांना कधी,**
**समजून घ्यावे शब्दावाचूनी.**
**शब्द शब्द ते वेचूनी घ्यावे,**
**शब्दांच्या ह्या दुनियेतूनी...**
**शब्दांच्या या दुनियेमध्ये**
**शब्द शब्द वेगळा**
**येथे प्रत्येक शब्दाचा**
**भावही असे आगळा...**
**शब्दच शब्दाला धरुनी बसती**
**साथ न सोडती हट्टाने**
**शब्द साकारण्या अक्षरेही**
**पाय मोडती थट्टेने...**
**उकार रफार काना मात्रा**
**अदा तयांच्या दाखवती**
**अनुस्वार अर्धचंद्र वेलांटी**
**सारे अलंकार मिरवती**
**नाजूक असती शब्द बोलके**
**भान ठेऊनी बोलावे**
**कठोर शब्दही येथे वसती**
**बोलण्याआधी तयांस जोखावे**
**समानार्थी सोबत विरुध्दार्थी**
**निरर्थक घालती वाद सदा**
**शब्दाला ही प्रतीशब्द असे**
**या शब्दांवर मी असे फिदा....**

– मंदार पानवलकर.



भारतीय सर्कसचे जनक

# विष्णुपंत मोरेश्वर छत्रे

भारतीय सर्कस ही युरोप-अमेरिकेच्या तुलनेत काहीशी उशिरा सुरू झाली. भारतीय सर्कसचे जनक होते विष्णुपंत मोरेश्वर छत्रे! छत्रे घराणे मूळचे बसणीचे. हे छोटेसे खेडेगाव गणपतीपुळे देवस्थानापासून सात-आठ किमी अंतरावर आहे. विष्णुपंतांचे वडील संस्थानी चाकरी करीत. त्यानिमित्त फिरत असताना, त्यांच्या मातोश्री व पत्नी, मुलेबाळे अंकलखोप येथे रहात असत. सांगली जिल्ह्यातील तासगावजवळ हे गाव आहे. इ.स. १८४० मध्ये विष्णुपंत छत्रे यांचा जन्म येथे झाला.

विष्णुपंत शाळेत फारसे रमले नाहीत. सवंगड्यांबरोबर हुंदडण्यात आणि कुत्री, माकडे, ससे, कबुतरे यांच्यात ते रमून जात. १६व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. जमखिंडीकर पटवर्धन संस्थानिकांच्या घोड्यांच्या पागेत, घोड्यावर स्वार होऊन घोडदौड करायला ते शिकले. पाठोपाठ रामदुर्ग संस्थानात चीफसाहेब श्रीमंत भावे यांच्या आश्रयाखाली ते चाबुकस्वार म्हणून नेमले गेले. मात्र, तेथे ते दोन वर्षेच राहिले. दररोजच्या कसरतीमुळे काटक व पिळदार बनलेली शरीरयष्टी, घौडदौडीतील चपळाई आणि धाडस करण्याची वृत्ती त्यांना स्वस्थ बसू देईना.

शास्त्रीय संगीताचेही त्यांना विलक्षण आकर्षण होते. त्यामुळे नशीब आजमावयाला ते ग्वाल्हेर संस्थानाकडे निघाले.

तेथे श्रीमंत बाबासाहेब आपटे हे घोडी शिकवून तयार करण्याच्या कामात वाकबगार होते, तर नावाजलेले गायक हदद खाँ तेथेच दरबारी होते. आपली दोन्ही स्वप्ने पूर्ण होतील; म्हणून विष्णुपंत ग्वाल्हेरला निघाले. पैशाचे पाठबळ नव्हते. जेमतेम जळगावपर्यंत त्यांनी रेल्वेने प्रवास केला. पैसे संपले. मग माधुकरी मागत ते चक्क पायी काही महिन्यांनी ग्वाल्हेरला पोहोचले.

श्रीमंत बाबासाहेब आपटे यांचे व विष्णुपंतांचे गुरु-शिष्याचे नाते जडले. घोड्यांच्या कसरतीत त्यांनी अथक मेहनत घेऊन प्रावीण्य मिळवले. अनेक अवघड कसरती ते लीलया करू लागले. सुमारे ८ ते १० वर्षांच्या या कालावधीत श्रीमंत बाबासाहेब आपटे यांचे ते पट्टशिष्य बनले आणि महाराष्ट्रात परतले, ते 'अश्वविद्या पारंगत' म्हणूनच! इंदूर, विंचूर, कुरुंदवाड, जव्हार अशा अनेक संस्थानांत ते घोड्यांना चाल आणि कवायतीचे शिक्षण देऊ लागले. त्यांची आर्थिक स्थितीही सुधारली. अनेक संस्थानिकांच्या गळ्यातील ते ताईत बनले.

कुरुंदवाडच्या संस्थानिकांनी त्याला प्रोत्साहन दिले आणि त्यातूनच भारतीय सर्कसचा पाया रचला जाऊ लागला. विष्णुपंत छत्र्यांनी तरुण कलाकार आणि तेजदार घोडे घेऊन कुरुंदवाड येथे सर्कशीची तालीम सुरू केली आणि अवघ्या ८-१० महिन्यांत सर्कस मूर्त स्वरूपात आणली.

मुंबई प्रांताचे तेव्हाचे गव्हर्नर फर्ग्युसन हे कुरुंदवाडकरांकडे आले होते. त्यांच्यासमोर 'खास अदाकारी' म्हणून विष्णुपंत छत्र्यांच्या घोड्यांच्या कसरती सादर करण्यात आल्या. जेमतेम १० मिनिटे

हे खेळ पाहण्यास वेळ देणाऱ्या गव्हर्नर फर्ग्युसनांना विष्णुपंत छत्र्यांच्या खेळांमुळे वेळेचे भानच राहिले नाही अन् ४५ मिनिटे ते हा शो बघत राहिले. विष्णुपंतांचे त्यांनी भरभरून कौतुक केले. यामुळे विष्णुपंतांची उमेद वाढली. त्यांच्या मित्रांनी आणि आश्रयदात्यांनी मुंबईत जाऊन शो करण्याचा आग्रह धरला आणि त्यातूनच नोव्हेंबर १८८२ मध्ये 'ग्रँड इंडियन सर्कस' ही विष्णुपंत छत्र्यांची सर्कस मुंबईच्या क्रॉस मैदानावर उभी राहिली.


२६ नोव्हेंबर १८८२ मध्ये या सर्कसचा पहिला शो म्हणजे 'भारतीय सर्कसचा जन्म' होता.

विष्णुपंत छत्रे यांच्या या पहिल्या भारतीय सर्कशीत पाश्चात्यांचे कसलेही अनुकरण नव्हते, तर स्वतंत्र अशा भारतीय बाण्याने ती उभी होती. देशभक्ती हा जणू तिचा आत्माच होता. या सर्कशीत एका खेळात एक तरुणी भारतमाता होऊन रथात बसून येई. तो रथ दोन सिंह ओढून आणत आणि रिंगणात आल्यावर 'गणा' नावाचा हत्ती त्या भारतमातारूपी तरुणीस व गणपतीस हार घालून पूजा करी. अशाप्रकारे छत्रे यांची सर्कस स्वातंत्र्यभावनेने प्रेरित होऊन काम करीत होती.

त्यानंतर 'छत्रे सर्कस' देशभर फिरत राहिली. नवनवीन प्रयोग, नवनवीन तंत्रांचा वापर करत राहिली. गॅसच्या बत्त्यांचा वापर करून त्यांचा शो सायंकाळीही व्हायचा. छत्र्यांनी ही सर्कस अधिक आकर्षक केली. पुढे कालौघात त्यांनी सर्कसची सारी धुरा त्यांचे बंधू काशिनाथपंत यांच्याकडे सोपवली व ते त्यांचे गायकीतील गुरूबंधू रहिमतखाँसाहेब यांच्याबरोबर देशाटनास निघून गेले. भारतीय सर्कसचा हा जनक स्वतःचे नाव अजरामर करून गेला.

१९०५ साली भारतातील सर्कस उद्योगाचे जनक विष्णुपंत छत्रे यांचे निधन झाले.


## दुःखद निधन !



आपल्या नवसनेह मासिकाच्या लेखिका डॉ.प्रमिला जरग यांचें पती श्री. द्वारकानाथ जरग यांचे रविवारी सकाळी साडे दहा वाजता दुःखद निधन झाले. नवस्नेह परिवार प्रमिला ताईंच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास सद्गती देवो.

**दिनविशेष (एप्रिल २०२३)**
**फाल्गुन - चैत्र -वैशाख १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**सोमवार दि. ३ :** छ.शिवाजी महाराज पुण्य., **मंगळवार दि. ४ :** महावीर जयंती, **बुधवार दि. ७ :** ज्योतिबा यात्रा., **गुरुवार दि. ६ :** हनुमान जयंती, श्रीमहालक्ष्मी रथोत्सव, **शुक्रवार दि. ७ :** गुड फ्रायडे, जाग. आरोग्य दिन, **रविवार दि. ९ :** ईस्टर संडे, संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.४८), **मंगळवार दि. ११ :** म.फुले जयंती, **शुक्रवार दि. १४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, **मंगळवार दि. १८ :** श्री स्वामी समर्थ पुण्य., **सोमवार दि. २० :** अमावास्या, **मंगळवार दि. २१ :** छ.संभाजीराजे पुण्य., **बुधवार दि. १९ :** संत चिले महा.पुण्यतिथी, **शनिवार दि. २२ :** अक्षय्यतृतिया, शिवजयंती, म.बसवेश्वर जयंती, रमजान ईद, वसुंधरा दिन, **सोमवार दि. २४ :** जलसंपत्ती दिन, **मंगळवार दि. २५ :** श्री आद्य शंकराचार्य जयंती, रविवार दि. ३० : राष्ट्रसंत तुकडोजी महा.जयंती

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - एप्रिल २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैष्णवी<br>O +ve | कोकणस्थ | २०/०५/९२<br>५.२ | शांडिल्य, धनू पूर्वाषाढा, दुसरे मध्य, मनुष्य | B. E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>२०.०४ लाख | विनायम दामले<br>मीरामार, पणजी, गोवा<br>मो. ९०४९९२८७०४ |
| २. | आरती<br>--- | देशस्थ | २५/०१/९४<br>५.४ | शौनक, मिथुन, आर्द्रा, तिसरे आद्य, मनुष्य | B.Com.<br>C.S. | पुणे येथे नोकरी | मा.प्रा.<br>७,०००/- | आरती प्रा. कुलकर्णी<br>पुणे.<br>मो. ९८२२२४४६४३ |
| ३. | स्नेहल<br>O +ve | कोकणस्थ | २३/०१/९५<br>५.४ | कौशिक, कन्या चित्रा, पहिले मध्य, राक्षस | M.Com.<br>CA Inter<br>1st Group | एम.एस.ई.बी कराड, सातारा | वा.प्रा.<br>४ लाख | मधुकर गोडबोले<br>कृष्णा कॅनल, कराड<br>मो. ९५५२३८५८७८ |
| ४. | पूजा<br>AB +ve | देशस्थ | २२/०५/९६<br>१५१ सेंमी | वसिष्ठ, कर्क पुष्य, प्रथम, मध्य, देवगण | M.Com. | | वा.प्रा.<br>--- | प्रसाद जोशी<br>फुलेवाडी, कोल्हापूर<br>मो. ९३५९२४७९७३ |
| ५. | सुकन्या<br>--- | देशस्थ | ७/११/९७<br>५.२ | विश्वामित्र, मकर श्रवण, तिसरे, अंत्य, देवगण | L.L.B. | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा.<br>--- | भूषण अनंत कुलकर्णी<br>रिगं रोड, कोल्हापूर<br>मो. ९८८१९३२४६२ |
| ६. | श्रृती<br>B +ve | देशस्थ | १२/५/९७<br>५.४ | वसिष्ठ, कर्क, पुष्य, प्रथम, मध्य, देवगण | ENTC<br>Diploma | नोकरी | वा.प्रा.<br>२.६० लाख | गुरुनाथ व्यंकटेश गुळवणी<br>राशिवडे, कोल्हापूर<br>मो. ९४२११११४६३७ |
| ७. | श्वेता<br>O +ve | देशस्थ | ३/१/९७<br>५.२ | विश्वामित्र, तुळ चित्रा, ३ रे, मध्य, राक्षस | B.E.<br>Civil | सरकारी नोकरी | मा.प्रा.<br>--- | सुरेश काशिनाथ शुक्ल<br>मारुती गल्ली, गारगोटी<br>मो. ९९७०८६९५५६ |
| ८. | वेदांती<br>AB +ve | कोकणस्थ | ६/२/९८<br>५.३ | कौडिल्य, वृषभ, मृग, प्रथम मध्य, देव | B.Ed.<br>Diploma | प्रायव्हेट लँग्वेज ट्रेनिंग | मा.प्रा.<br>३०,०००/- | मिलींद नारायण पटवर्धन<br>राजारामपुरी, कोल्हापूर<br>मो. ९१७५९६२१४६ |
| ९. | कस्तुरी<br>A +ve | देशस्थ | १४/६/९९<br>५.५ | भारद्वाज, मिथुन मृग, ४ थे मध्य, देवगण | D.Pharm<br>B.Pharm | नोकरी | वा.प्रा.<br>१.५० लाख | महेश खंडेराव पेशवे<br>मु.पो.जेजुरी, ता. पुरंदर<br>मो. ९९२२५५४८५० |
| १०. | मधुरा<br>B +ve | कऱ्हाडे | १०/५/९९<br>५.४ | गार्ग्य, कुंभ, शततारका, ३ रे आद्य, राक्षस | B.Com.<br>PG.Dip.<br>& Other | घरगुती ट्युशन | मा.प्रा.<br>--- | राजेंद्र वसंत मिराशी<br>जयसिंगराव पार्क, कागल<br>मो. ९४२०७७७८८१ |

### श्रृती उमेश नाईक (प्रथम वधू) (देशस्थ)

**जन्मतारीख :** १४/७/१९९४
**शिक्षण :** B.Com., MBA
**रक्तगट :** ----- **उंची :** १६२ सेंमी
**नोकरी :** निपाणी **वा.प्रा. :** ५ लाख
**पत्ता : श्री. उमेश नाईक,** मु.पो. निपाणी
मोबा. 9901383719, 8310182543
**अपेक्षा :** MCA, MBA, Engg. Any Trade, CA, ME

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गौतम | कन्या | उत्तरा | चौथे | आद्य | --- |

### प्रणाली प्रमोद मनोळी (प्रथम वधू) (देशस्थ)

**जन्मतारीख :** २५/०५/१९९७ **उंची :** ५.३
**शिक्षण :** B.C.A. **रक्तगट :** A +ve
**नोकरी :** ---
**अपेक्षा :** नोकरी, सुस्थापित असावा.
**पत्ता : श्री. प्रमोद कृष्णाजी मनोळी**
कुंभारखिंड रोड, गावभाग, सांगली.
मोबा. 7030654445



| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | धनु | पूर्वाषाढा | प्रथम | मध्य | मनुष्य |

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - एप्रिल २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लौकिक<br>O +ve | देशस्थ | २५/६/८४<br>५.११ | वसिष्ठ, मेष, भरणी, १ ले मध्य, देव | B.Com. | व्यवसाय पुणे मेडिकल डिस्ट्रिब्युटर | मा.प्रा.<br>६०,०००/- | रमेश आबादे<br>संत तुकाराम सोसा,पर्वती,<br>पुणे. ९८८१५७३६०५ |
| २. | किरण<br>A - ve | देशस्थ | १६/११/८५<br>५.५ | विश्वामित्र, धनू पूर्वाषाढा, ३ रे मध्य, मनुष्य | B.Com.<br>MBA | नोकरी + शेअर मार्केट कोल्हापूर | वा.प्रा.<br>७ लाख | किशोर डंके<br>सागारमाळ, कोल्हापूर<br>९०६७१८४३५३ |
| ३. | नचिकेत<br>O +ve | देशस्थ | ४/२/८६<br>५.७ | शांडिल्य, वृश्चिक ज्येष्ठा, ३ रे आद्य, राक्षस | Interior Des.<br>B.Com. | पुणे येथे व्यवसाय | मा.प्रा.<br>१०,०००/- | शशिकांत पानसे<br>सिंहगड रोड, पुणे<br>९८५०२९९३०० |
| ४. | अमित<br>B -ve | देशस्थ | १५/७/८७<br>५.७ | अत्री, कुंभ, पूर्वाभाद्रपदा, ३रे आद्य, मनुष्य | B.E.<br>(Mech) | पुणे येथे नोकरी | मा.प्रा.<br>९५,०००/- | अनिल जोशी<br>पत्रकार नगर, सांगली<br>९४२२०४२१३९ |
| ५. | मोरेश्वर<br>B +ve | कऱ्हाडे | २/५/८८<br>५.१० | कौशिक, तूळ, स्वाती, ४ थे, अंत्य, देव | B.E.<br>(Instru) | सांगली येथे नोकरी | वा.प्रा.<br>३.५ लाख | गजानन गलगले<br>३३८, साक्षी अपा,सांगली<br>९४२२२८८६२० |
| ६. | अनिकेत<br>B -ve | देशस्थ | १०/४/८९<br>५.५ | शांडिल्य, वृषभ मृग, २ रे मध्य, देव | MBA<br>BE<br>Civil | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>५ ते ६लाख | शशिकांत पानसे<br>सिंहगड रोड, पुणे<br>९८८१४९९५०० |
| ७. | प्राजक्त<br>--- | देशस्थ | १४/४/९१<br>५.७ | हरितत्स, अनुराधा वृश्चिक, ४ थे मध्य, देव | B.E.<br>(Instru) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>१२ लाख + कौटु ४.४५ | बाळकृष्ण निबंधे<br>सिंहगड रोड, धायरी फाट्याजवळ<br>पुणे. ९८२२१४३१०३ |
| ८. | संकेत<br>B - ve | देशस्थ | १९/१०/९१<br>५.५ | अत्री, कुंभ शततारका, ४ थे आद्य, राक्षस | B.Sc.<br>MBA | व्यवसाय आर्थिक सल्लागार | ४.५ लाख | शंकर दत्तात्रय जोशी<br>मीराबाग, रंकाळा पार्क,<br>कोल्हापूर ९९२१५१५९३८ |
| ९. | महेश<br>O +ve | देशस्थ | ६/४/९२<br>५.९ | काश्यप, कृतिका २रे, आद्य, राक्षस | B.Com.<br>CFP | बँक ऑफ महाराष्ट्र पलुस | वा.प्रा.<br>५.५ लाख | शेखर आंबेकर, फ्लॅट नं.३०७,<br>साई आनंद, वडगाव शेरी, पुणे<br>८१४९३८६३११ |
| १०. | नरेंद्र<br>--- | देशस्थ | १५/११/९३<br>५.९ | कौशिक, वृच्छिक अनुराधा, ३ रे मध्य, देव | MCA | व्यवसाय कोल्हापूर | वा.प्रा.<br>४.२० लाख | अनघा विजय कुलकर्णी<br>१०/२, तुळजाभवानी नगर,<br>कोल्हापूर. ८०८७२४०७४१ |

## भूषण नाझीरकर (देशस्थ)



**जन्मतारीख :** १२/११/१९८० **उंची :** ५.४
**शिक्षण :** M.Sc., B.Ed., M.Phill, Ph.D.
**नोकरी :** मुंबई येथे **वा.प्रा. :** ९ लाख
**पत्ता : परशुराम मोरेश्वर नाझीरकर**
मालवणी कॉलनी नं.1, रूम नं. 141
दत्तसेवा पतपेढी, मालाड(प.) मुंबई (स्वत:चे घर)
मोबा. 9930361933, 9821518316
**अपेक्षा :** पदवीधर, नोकरदार

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | धनु | पूर्वाषाढा | ३ रे | मध्य | मनुष्य |

## मानस मिलिंद कुलकर्णी (देशस्थ)

**जन्मतारीख :** ९/११/१९९३ (A +ve)
**उंची :** ६.५ **शिक्षण :** 12 वी (एकुलता एक)
**व्यवसाय :** फूड मार्ट (स्वत:च्या जागेत)
**वा.प्रा.** : ४ लाख (स्वत:चा बंगला)
**पत्ता : श्री. मिलिंद माधव कुलकर्णी**, ज्योतीर्मय, अपूर्वा कॉलनी, हनुमान नगर, कोल्हापूर. मोबा. ७३८७६७८८८१, ७३८७६७८८८२
**अपेक्षा :** समजुतदार, अनुरूप.(मानसिक तणावाचा त्रास,औषध चालू)

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | सिंह | पूर्वा | दुसरे | मध्य | मनुष्य |

## ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, पंचरत्न वधूवर सूचक केंद्र आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त विद्यमाने

# ❋ ब्राह्मण वधूवरांचा राज्यस्तरीय मेळावा ❋

### रविवार, दि. १६ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११ ते ४

**मेळाव्यात प्रत्यक्ष सहभागी व्हा. श्री महालक्ष्मीच्या आशीर्वादाने अनुरूप जोडीदार मिळवा.**

**नोंदणी शुल्क व सुविधा :- प्रत्यक्ष थेट भेट मेळावा. नोंदणी शुल्क रु. ५००/- फक्त.**

वधू-वर यांचेबरोबर एकाच व्यक्तीला अल्पोपहार, एक छोटी डायरी, पेन, मेळाव्यानंतर प्रसिद्ध होणाऱ्या वधूवरांच्या माहितीच्या विशेषांकात फक्त माहितीची प्रसिद्धी (फोटो नाही) परगावहून येणाऱ्या वधू-वर पालकांसाठी ॲटॅच्ड रूममध्ये अत्यल्प दरात निवासी व्यवस्था.

(प्रथम येणाऱ्यास प्राधान्य, निवास व्यवस्था संपर्क : ०२३१-२५४१२६८ / ८४८४८५१५९१)

**मेळाव्यात सहभागी व्हायची इच्छा आहे पण... येणे जमत नाही काय करू?**

**प्रत्यक्ष येणे शक्य नाही अशा वधूवरांसाठीच खास दोन योजना.**

- **पॉवर पॉईंटद्वारे माहिती देवू - रू. ७०० :-** मेळाव्यात थेट सहभाग घेणे शक्य नसलेल्या मुला-मुलींची माहिती, फोटो, संपर्क नंबरसह पॉवर पॉईंटद्वारे मेळाव्यादिवशी उपस्थितांना मोठ्या स्क्रीनवर माहिती दाखवली जाईल व वधूवर विशेषांकात फक्त माहिती प्रसिद्ध केली जाईल.
- **व्हिडिओ क्लिप - रु. ७०० :-** वधूवरांनी आपल्या संपूर्ण माहितीची जास्तीत जस्त ६० सेकंदाची छोटी व्हिडिओ क्लिप बनवून व्हॉटस्ॲपवर पाठवणे. तुमच्या व्हिडिओचा प्रभाव पडण्यासाठी 'पंचरत्न' संस्थेच्या ९८८१२ ९१८६३ / ०२३१-२६२१००१ वर संपर्क करा. योग्य मार्गदर्शन व वधूवर विशेषांकात फक्त माहिती प्रसिद्ध करू.

**महत्त्वाचे :-** मेळावा वेळेत सुरू होईल. वधूवरांच्या व पालकांच्या सहकार्याची अपेक्षा. नोंदणी केलेल्यांनाच मेळाव्यात प्रवेश. मेळाव्यात सहभागी असलेल्या वधूवरांनाच स्टेजवर बोलण्याची संधी.

**❋ मेळाव्यानंतर वधूवरांच्या विशेषांकात फक्त माहिती प्रसिद्धी ❋**

अधिक माहितीसाठी व योग्य मार्गदर्शनासाठी त्वरीत संपर्क साधा व नोंदणी करा.

**ब्राह्मण सभा, करवीर, मंगलधाम :-** २५४७४६५ / ८४८४८५१५९१ वेळ : स. १० ते १.३० व दु. ३ ते ७

**पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर, संपर्क :-** ०२३१-२६२१००१ (व्हॉ./गुगल पे.९८८१२९१८६३)

**कोल्हापूर चित्पावन संघ, संपर्क :-** ०२३१-२५४६२२५ / ७६२०५४६२२५

**आपले स्वागतोत्सुक**

**ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, कोल्हापूर -** अध्यक्ष : ॲड. विवेक शुक्ल, उपाध्यक्ष : डॉ. दीपक आंबर्डेकर, कार्यवाह : श्रीकांत लिमये, सहकार्यवाह : सौ. अनुराधा गोसावी, खजानिस : रामचंद्र टोपकर, संचालक : नंदकुमार मराठे, संतोष कोडोलीकर, डॉ. उदय कुलकर्णी, श्रीराम धर्माधिकारी, किरण धर्माधिकारी, रामचंद्र पुरोहित, सुधीर जोशी, महेश कुलकर्णी, अशोक कुलकर्णी, सौ. वृषाली कुलकर्णी, व्यवस्थापक : अशोक जोशी.

**पंचरत्न वधूवर सूचक केंद्र :-** संचालक : सौ. श्रुती श्रीकांत लिमये, श्रीकांत अनंत लिमये, व्यवस्थापक : सौ. सोनिया सोनटक्के-कुलकर्णी, योगिता इनामदार, सौ. स्नेहलता उपाध्ये.

**कोल्हापूर चित्पावन संघ :-** अध्यक्ष : नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष : प्रसाद भिडे, सर्व संचालक मंडळ सदस्य

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सार्वजनिक बोडण सोहळा





**कोल्हापूर चित्पावन संघातर्फे दि. १९ मार्च रोजी सार्वजनिक बोडण सोहळा संघाच्या रमादामोदर सभागृहात पार पडला. एकूण ६ बोडणे घेण्यात आली होती. त्यासाठी पंकजाताई गोरे, अंजली आपटे, अपूर्वा केळकर, सुषमा जोशी व इतर भगिनींचे मोठे सहकार्य लाभले.**

○ Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly ○
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.



- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.